cmyk

## संपादकीय

### तात्काळ मदत करा !

राज्यात गत काही दिवसांपासून अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणतात तसे अवकाळी पावसाला गारपिटीची साथ मिळाली आहे. ४-५ दिवसांपासून अवकाळी पाऊस पडतो आहे. त्यात गारपीट होत असल्याने मराठवाडा, विदर्भ, खान्देश परिसरात शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विदर्भात नागपूर, अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यात वादळी वारा, गारपिटीसह मुसळधार पाऊस सुरू आहे. यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलडाणा जिल्ह्यात ५० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-४ | रविवार दि.१४ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये





# मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा शक्तिपीठ महामार्गाला विरोध

## परळीत शेतकऱ्यांनी घेतली व्यापक बैठक, द्रुतगती महामार्गापेक्षा सिंचन अनुशेष पूर्ण करा

परळी । प्रतिनिधी

मराठवाड्यात अगोदरच सिंचनाखाली जमीन कमी आहे. त्यातच पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्रुतगती शक्तिपीठ महामार्ग नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून जात असून हा मार्ग अत्यंत सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत



> शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या नावाखाली शेतकऱ्यांची सुपीक जमीन कवडीमोल भावात संपादित करून कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे काम हे केंद्र आणि राज्य सरकार करत आहे.महामार्गापेक्षा मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे कट कारस्थान सरकार कडून सुरू आहे.
>
> -ॲड.अजय बुरांडे, शेतकरी नेते, बीड.

जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत. यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्रुतगती पान २ वर

## अजितदादांनीच आधी भाजपात पाठवले-पाटील

धाराशिव । प्रतिनिधी

२०१९ साली आम्हाला अजितदादांनीच आधी भाजपात पाठवले आणि त्यानंतर गेल्यावर्षी ते स्वतः भाजपसोबत आले असे विधान धाराशीवच्या मल्हार पाटील यांनी केले आहे. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. २०१९ पासूनच अजितदादांच्या डोक्यात वेगळा प्लॅन होता का असा प्रश्न यावरुन ओमराजे निंबाळकरांनी विचारल आहे. आधी अर्चना पाटलांनी अजित पवारांऐवजी घड्याळाचे चिन्ह लावून फक्त मोदींचा फोटो ठेवल्याने वाद झाला. नंतर आता त्यांचे पुत्र मल्हार पाटलांनी अजित पवारांबाबतचे मोठे विधान केले आहे.

शरद पवार आणि पद्मसिंह पाटील हे कधीकाळी चांगले सहकारी होते. पद्मसिंह पाटलांच्या बहिण या अजित पवारांच्या पत्नी म्हणजे सुनेत्रा पवार आहेत. पान २ वर

# पंकजा मुंडेसाठी धोक्याची घंटा; टी.पी. मुंडेमुळे ओबीसी मताचे होणार विभाजन

## रेणापुरसह परळीतून तीन वेळा मुंडे घराण्याच्या विरोधात लढवली निवडणुक



### १९८४ मध्ये अपक्ष ओबीसी उमेदवारामुळे केशरकाकू जिंकल्या

टीपी मुंडे यांच्यानंतर असे दोन ओबीसी चेहरे आहेत की ज्यांच्यामुळे दोन बीड लोकसभा निवडणुकांचा निकाल वेगळा लागला. १९८४ च्या बीड लोकसभा निवडणुकीमध्ये कॉंग्रेस आयकडून केशरकाकू क्षीरसागर तर भाजपकडून आदिनाथ नवले निवडणुकीच्या आखाड्यात होते. क्षीरसागर यांना दोन लाख २२ हजार ४२१ मते मिळाली. यावेळी एक ओबीसी चेहरा असा होता की तो जर निवडणुकीत अपक्ष लढला नसता तर केशरकाकू क्षीरसागर यांचा पराभव झाला असता. परळी तालुक्यातील वाघबेट येथील श्रीधर गीते हे अंतुले कॉंग्रेसकडून उगवता सुर्य या चिन्हावर अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे होते. नवले भाजपकडून उभे असल्याने बहुतेक ओबीसी मते त्यांना मिळणार होती मात्र श्रीधर गीते यांनी एक लाख ११ हजार ५९ मते घेतल्याने केशरकाकू यांचा या ठिकाणी मोठ्या फरकाने विजय झाला.

### टी. पी. मुंडे यांच्यामुळे परळीत काय फरक पडू शकतो?

१९९९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून रेणापुर मतदार संघात टी.पी. मुंडे यांनी निवडणूक लढवली होती. यावेळी गोपीनाथ मुंडे यांना ७० हजार १८७ मते तर टी. पी. मुंडे यांना ३९ हजार २५४ मते मिळाली होती. त्यानंतर २००९ मध्ये परळी विधानसभा मतदारसंघ पुनर्रचनेत स्थापन झाला. यावेळी भाजपकडून पंकजा मुंडे या परळी मतदारसंघातून निवडणुकीत उभ्या होत्या तर कॉंग्रेसकडून टीपी मुंडे हे मैदानात होते. पंकजा मुंडे यांना ९६ हजार ९२२ मते तर टी. पी. मुंडे यांना ६० हजार १६० मते मिळाली. यावेळी पंकजा मुंडे यांच्या पेक्षा ३६ हजार ६२ मते टी.पी. मुंडे यांना कमी पडली. त्यानंतर २०१४ च्या निवडणुकीमध्ये परळीमधून पंकजा मुंडे यांना ९६ हजार ९०४, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे धनंजय मुंडे यांना ७१ हजार ९ मते तर कॉंग्रेसचे उमेदवार टी.पी. मुंडे यांना १४, ९४६ मते मिळाली होती.



विशेष प्रतिनिधी । बीड

बीड लोकसभा निवडणूक आता चौरंगी होण्याचे चिन्ह आहेत. पंकजा मुंडे यांच्यानंतर निवडणुकीच्या आखाड्यात दुसरा मुंडे उतरला आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांना या दुसऱ्या आणि अनुभवी मुंडेचा किती फटका बसतो याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. परळीच्या टि.पी. मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या विरोधात एक वेळा तर पंकजा मुंडे यांच्या विरोधात दोन वेळा विधानसभा निवडणूक लढवली आहे. ओबीसी सभांमध्ये घेतलेला सहभाग टिपी मुंडे यांच्यासाठी जमेची बाजू ठरणार आहे. तसेच गेल्या चार निवडणुकीनंतर पहिल्यांदाच बीड मतदार संघात ओबीसी मतांमध्ये विभाजन होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर पंकजा मुंडे यांच्यासाठी धोक्याची घंटा असणार आहे.

परळीचे आक्रमक आणि सर्वांना परिचित असलेले मुंडे म्हणजे त्रिंबक उर्फ टी. पी. मुंडे हे आहेत. प्रकाश अण्णा शेंडगे यांच्या ओबीसी बहुजन पार्टीच्या वतीने टीपी मुंडे बीडमधून लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. याबाबत त्यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन बीडमध्ये घोषणा केली, टीपी मुंडे यांच्या एन्ट्रीमुळे परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये पंकजा मुंडे यांना नेमका फटका कसा बसू शकतो हे पान २ वर

### सुशिलाताईनी ओबीसी मते मिळवल्यानेच केशरकाकुंचा पराभव





१९९९ च्या निवडणुकीमध्ये भाजपकडून रजनीताई पाटील यांना दोन लाख ७९ हजार ९९५ मते मिळाली तर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या उमेदवार केशरकाकु क्षीरसागर यांना दोन लाख २२ हजार ५३५ मते मिळाली. या निवडणुकीत ओबीसी नेत्या सुशीलाताई मोराळे शेकापच्या उमेदवारीवर लढल्या. पक्ष आणि ओबीसी समाजाची अशी त्यांना ७३ हजार ९०० मते मिळाली. या निवडणुकीमध्ये मोराळे यांच्यामुळे केशरकाकू यांना फटका बसला आणि त्यांचा या निवडणुकीत मोठ्या फरकाने पराभव झाला.

### टि.पीं मुंडेबाबत इतर मतदारसंघात काय होणार?

परळी वगळता इतर सर्वच मतदारसंघांमध्ये टी.पी. मुंडे यांना ओबीसी चेहरा म्हणून आणि मराठा ओबीसी संघर्षाच्या वेळी सक्रिय सहभाग राहिल्याने त्यांना प्रत्येक मतदारसंघात ओबीसींची चांगली मते मिळतील असे दिसते. टी. पी. मुंडे यांना जेवढी मते मिळतील तेवढा फटका पंकजा मुंडे यांना बसणार आहे.

### मुंडे बहिण-भाऊ एकत्र असतानाही टि.पी. मुंडेंनी घेतले ६० हजार मते

एकंदरीत परळी मतदारसंघाचा अभ्यास केला तर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे दोघेही २००९ च्या परळी विधानसभा निवडणुकीत एकत्र असताना सुद्धा ६० हजाराच्या पुढे मते टी.पी. मुंडे यांनी घेतली होती. त्यामुळे परळी मतदारसंघात दोन्ही मुंडे बहीण -भाऊ एकत्र असले तरी टी. पी. मुंडे चांगली मते घेतील असे म्हटले जात आहे. तसे झाले तर परळी या स्वतःच्या मतदारसंघांमध्येच पंकजा मुंडे यांची मोठी कोंडी होऊ शकते.

### नाशिकमध्ये वंचित शांत

नाशिकः नाशिकच्या जागेसाठी वंचित बहुजन आघाडीने वेट अँड वॉचची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. महायुतीच्या उमेदवारीनंतरच प्रकाश आंबेडकर पत्ता खोलणार, अशी चर्चा आता रंगली आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २४.०० क्विंटल | २,६७२ | ३,१०० | २,८६४ |
| ज्वारी/हायब्रिड:१६५.०० क्विंटल | १,७५० | ३,७०० | २,६२९ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : १६.५० क्विंटल | १०,७२१ | १०,७२१ | १०,७२१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ५.०० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६० |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १८५.५० क्विंटल | ४,६६० | ४,७११ | ४,६९० |
| हरभरा: १३.०० क्विंटल | ५,३०० | ५,६४० | ५,५२० |

# कॉंग्रेसचे सरकार आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी! पुर्वीही केली होती आताही करणार-राहुल गांधी



भंडारा । वृतसंस्था

मी माझ्या यात्रेदरम्यान लाखो शेतकऱ्यांशी संवाद साधला. अरबपतींचे कर्ज माफ होतात, पण आमचे कर्ज माफ होत नाही, असा सवाल शेतकऱ्यांनी केला. या देशातील शेतकऱ्यांसमोर आजही अनेक समस्या आहेत. त्यामुळे आमचे सरकार येताच सर्वप्रथम देशातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार. कानुनी एमएसपी, जातिनिहाय जनगणना आणि ३० लाख सरकारी नोकर भरती केली जाईल. ही कॉंग्रेसची गॅरंटी आहे, अशी ग्वाही कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दिली. ते भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे महाविकास आघाडीच्या लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांच्या प्रचारसभेत शनिवार (दि.१३) बोलत होते.

ते म्हणाले, आम्ही जे घोषणापत्र तयार केले, ते बंद खोलीत नव्हे तर देशातील हजारो लोकांकडून, शेतकरी, कामगार, बेरोजगार, महिलांसोबत चर्चा करुन तयार करण्यात आलेले आहे. हे कॉंग्रेस पक्षाचे घोषणापत्र नसून ते जनतेचे घोषणापत्र असून आपल्या मनातील गोष्ट आम्ही येथे लिहून ठेवल्याचा उल्लेख त्यांनी केला. कोरोना काळात प्रधानमंत्री थाळी वाजविण्याचे व मोबाईलचे लाईट लावण्याचे काम करीत होते. प्रधानमंत्री मोदी म्हणतात मी ओबीसी आहे. परंतु ओबीसी समाजाकडे त्यांचे लक्ष नाही. या देशात जेवढी लोकसंख्या आदिवासी, दलित, ओबीसींची आहे, त्यांचा वाटा त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याचे काम आमचे सरकार करणार आहे. भाषणादरम्यान त्यांनी प्रसारमाध्यमांवरही टीका केली. राहुल गांधी म्हणाले, आमचे सरकार येताच अग्निवीर योजना रद्द केली जाईल. आम्हाला दोन प्रकारचे शहीद नकोत. ही योजना आर्मीने तयार केली नसून पान २ वर

# ...अन्यथा लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकू

## पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा इशारा

धुळे । प्रतिनिधी

राज्यात होऊ घातलेल्या पोलीस भरतीच्या पार्श्वभूमीवर सध्या इच्छुक विद्यार्थ्यांकडून मैदानी चाचणीचा सराव सुरू आहे. मात्र आगामी लोकसभा निवडणुकीत (२०२४) भावी खासदारांनी वयोमर्यादेसह परीक्षा फी कमी करण्याच्या प्रश्नावर निर्णय न घेतल्यास निवडणुकीवर बहिष्कार टाकू, असा इशारा विद्यार्थ्यांकडून देण्यात आलेला आहे.

### मतदानावर बहिष्कार टाकू

पेपर फुटीसह भरती प्रक्रियेला येणारी स्थगिती या प्रश्नांकडेदेखील खासदारांनी लक्ष दिले पाहिजे. शासन निर्णयानुसार वयोमर्यादा संपलेल्या विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांची मुदत वाढ देण्यात येऊन त्यांना दिलासा द्यावा अन्यथा या लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार घालू, असा इशारा या विद्यार्थ्यांनी दिला आहे. तर दुसरीकडे महिलांसाठी पोलीस भरतीत जास्तीत जास्त जागा काढून त्याबाबत देखील खासदारांनी लक्ष दिले पाहिजे अशी अपेक्षा महिला विद्यार्थिनींनी केली आहे.



राज्याची कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणारे भावी पोलीस कर्मचारी सध्या मैदानी चाचणीचा सराव करीत असून होऊ घातलेल्या पोलीस भरतीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून तयारी सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या विद्यार्थ्यांनी भावी खासदारांकडून आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी हे ग्रामीण भागातील तसेच गरीब कुटुंबातील असतात. मात्र महाराष्ट्र शासन एक हजार रुपये फी प्रत्येक परीक्षेसाठी आकारात असते. यामुळे आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते. राजस्थानच्या धर्तीवर १२० रुपयांत वर्षभरातील पोलीस भरतीसह सर्व स्पर्धा परीक्षा घेण्यात याव्यात, अशी मागणी या विद्यार्थ्यांनी केली आहे.

## संदेशखाली येथील हिंसाचाराच्या चौकशीसाठी मानवाधिकार आयोगाच्या १२ शिफारशी

नवी दिल्ली । वृतसंस्था

पश्चिम बंगालमधील वादग्रस्त संदेशखाली हिंसाचार प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणांनी निष्पक्ष चौकशी करावी, अशी शिफारस राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने केली आहे. या हिंसाचाराची पाहणी करण्यासाठी गेलेल्या आयोगाच्या पथकाला स्थानिक पोलिस आणि प्रशासनाने कोणतेही सहकार्य केले नसल्याचा ठपकाही मानवाधिकार आयोगाने ठेवला आहे.

या प्रकरणात बळकावलेल्या जमिनी कायदेशीर मालकांना परत मिळाव्यात आणि तसेच संदेशखाली परिसरातून गायब झालेल्या महिलांना शोधण्यात यावे यासह १२ शिफारशी मानवाधिकार आयोगाने केल्या आहेत. तसेच पश्चिम बंगाल सरकारने प्रत्येक शिफारशीवर आठ आठवड्यात कृती अहवाल सादर करावा असा आदेशही आयोगाने दिला आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान पश्चिम बंगालमध्ये संदेशखाली येथे झालेला हिंसाचार आणि महिलांवरील लैंगिक अत्याचाराचा मुद्दा तापला असून यावरून सत्ताधारी तृणमूल कॉंग्रेस आणि विरोधी पक्ष भाजपदरम्यान आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# तात्काळ मदत करा !

राज्यात गत काही दिवसांपासून अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणतात तसे अवकाळी पावसाला गारपिटीची साथ मिळाली आहे. ४-५ दिवसांपासून अवकाळी पाऊस पडतो आहे. त्यात गारपीट होत असल्याने मराठवाडा, विदर्भ, खान्देश परिसरात शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विदर्भात नागपूर, अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ जिल्ह्यात वादळी वारा, गारपिटीसह मुसळधार पाऊस सुरू आहे. यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलडाणा जिल्ह्यात ५० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाने आता पंचनामे करण्याच्या भानगडीत वेळ घालविण्यापेक्षा तात्काळ मदत करण्याची गरज आहे.

सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यात झाले आहे. सुमारे ३५ हजार हेक्टर क्षेत्रात रबी पिकांसह फळबागांना पाऊस-गारपिटीचा तडाखा बसला. चांदूर बाजार, मोर्शी, वरूड व अचलापूर तालुक्यात सुमारे १८ हजार हेक्टरमधील संत्रा, मोसंबी, केळी, आंबा पिकांचे नुकसान झाले. जळगाव जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाने हजेरी लावली. अवकाळी पावसामुळे फळबागांचे विशेषत: लिंबू, संत्रा, आंबा, केळी बागांचे मोठे नुकसान झाले. राज्यात सध्या उष्णतेची लाट आहे त्यात अवकाळी पाऊस-गारपिटीची भर पडली आहे. अवकाळी पावसाने मराठवाड्यातही मोठे नुकसान झाले. परभणी, बीड, हिंगोली जिल्ह्यांना गुरुवारी अवकाळी पाऊस व गारपिटीचा तडाखा बसला. लातूर जिल्ह्यातही तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस होतो आहे. त्यामुळे खरीप, रबी आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. उशिरा पेरणी झालेल्या ज्वारीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. आधीच उत्पन्न कमी आणि उत्पादनाचा खर्च अधिक अशी अवस्था झाल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. शेतमजुरीत दुपटीने वाढ होऊनही मजूर मिळेनासे झाले आहेत. शेतमालाला रास्त भाव मिळत नाही. दरवर्षी गुढीपाडव्याला शेतमजुरीच्या दरात वाढ होत असल्याने शेतकऱ्याचे गणित बिघडले आहे. आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीस आल्याने शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले आहे. निसर्गाची साथ मिळत नसल्याने शेती हा बेभरवशाचा व्यवसाय बनला आहे. राज्यात सध्या संमिश्र हवामानाची स्थिती आहे. काही भागात उष्णतेची लाट, काही भागात वादळी पावसासह गारपिटीचा फटका सहन करावा लागत आहे. गत दोन-तीन दिवसांत वादळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार सध्या उत्तर कर्नाटकच्या किनारपट्टीपासून मध्य महाराष्ट्र, कोकण पार करून वायव्य राजस्थानपर्यंत द्रोणीय स्थिती, विखंडित वारे तसेच कमी दाबाचा पट्टा कार्यरत आहे. विदर्भात गारपीट तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात वादळी वारे, मेघगर्जनेसह पाऊस पडेल असा अंदाज आहे. अवकाळी पावसाबरोबरच राज्यातील सर्वच भागात तीव्र उष्णतेच्या झळा सहन कराव्या लागणार आहेत. निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी परिसराला उष्णतेचा कमाल तडाखा सहन करावा लागत आहे. तेथे कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअसवर पोहोचले होते. तापमान अचानक कमी-जास्त होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. निसर्गाची अवकृपा झाली की नुकसान शेतीचेच होते. शेतकरी नागवला जातो. अवकाळीच्या फटक्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे. हे शिवधनुष्य कोणते सरकार उचलणार? याकडे आता लक्ष लागले आहे.

## मत मागण्यासाठी गेलेल्या उमेदवाराला शेतकऱ्याचे उत्तर..


माझं मत तुम्हाला हवं असेल तर ऑनलाईन अर्ज करा, त्यानंतर नवरा - बायको दोघे माझ्याकडे या. सोबत आधार कार्ड, रेशन कार्ड, रहिवासी दाखला, सातबारा ही सगळी कागदपत्रं घेऊन या. त्यानंतर मला जशी तत्वत: कर्जमाफी मिळाली त्याच पद्धतीनं तुम्हाला पण तत्वत: मतदान करण्याचा अभ्यास करून मग तुम्ही लोकप्रतिनिधी होण्याच्या योग्यतेचे व लायकीचे आहात का ? हे कागदोपत्री पाहूनच तुम्हाला मतदान केलं जाईल.



# जल व्यवस्थापन आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर..

**आपल्या देशाचे संविधान करते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य सर्वांनाच माहिती आहे. मात्र त्यांनी विविध जबाबदाऱ्या स्वीकारल्या त्या विविध क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचं ठरतं. आपल्या देशात लोकशाही कशा पद्धतीची असावी आणि प्रत्येकाचे अधिकार आणि कर्तव्य निश्चित करण्याचे काम संविधानातून त्यांनी केले त्यांच्या इतकेच मोलाचे काम त्यांनी एक जलतज्ज्ञ या भूमिकेतून केले. यावेळी विषयातील तज्ज्ञ म्हणून त्यांनी दिलेले योगदान आजच्या काळात अतिशय आवश्यक ठरत आहे.**





**आपला देश भौगोलिक दृष्ट्या पर्जन्याचा विचार करता मौसमी हवामानाच्या प्रदेशात येतो देशाची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषी आधारित व्यवस्थेवर अवलंबून आहे आणि ही कृषी व्यवस्था चार महिन्यात पडणाऱ्या मौसमी पावसावर अवलंबून आहे. देशाचा भौगोलिक विस्तार खूप मोठा आहे त्यामुळे दक्षिणेकडून येणारा मोसमी पाऊस देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या काळात पोहोचतो त्यातीलच काही भाग प्रजन्य छाया क्षेत्रात आहेत.**

पावसाच्या विषम प्रमाणामुळे आपल्या देशात एकाच वेळी काही भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य अर्थात कोरडा दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी झाल्याने पूरजन्य परिस्थिती असे चित्र सातत्याने आपण बघतो. एकाच काळात देशात काही भागात नागरिक पाण्यासाठी त्रस्त व काही भागात पाण्याने ग्रस्त असल्याचे हे चित्र दिसते. निसर्गावर नियंत्रण मिळवणं शक्य नाही. यातून निर्माण होणाऱ्या संकटावर मात करायची असेल तर पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि नियोजन हाच एकमेव पर्याय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाणले होते.

स्वतंत्र्य प्राप्ती पूर्वीपासून म्हणजे व्हाईसरॉय समिती (मंजूर) सदस्य असल्यापासून त्यांनी जल व्यवस्थापनासाठी ब्रिटिश सरकारला आग्रहीपणे जल व्यवस्थापनाची मागणी केली होती. १९४३ मध्ये दामोदर नदीच्या भीषण अशा महापुराने झालेले नुकसान बघताना त्यांनी अमेरिकेतील टेनेसी प्रकल्पाप्रमाणे भारततही पूर्ण यंत्रणासाठी धरण बांधून त्याचा वापर करण्याची मागणी केली. ब्रिटिश सरकारचे मुख्य अभियंता यांनी त्याच काळात इजिप्त मधील आस्वान धरण प्रकल्पावर काम केले होते. या ज्ञानाचा व त्या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर भारतात व्हावा यासाठी डॉ आंबेडकरांनी प्रयत्न केले.

नद्यांमधील पाण्याचे व्यवस्थापन करताना त्याचा विविध प्रकारे वापर शक्य आहे यात पूरनियंत्रण करण्यासोबतच जलविद्युत निर्मिती करणे आणि धरणाच्या कालव्यांमधून सिंचनाद्वारे कृषी क्षेत्रासाठी केला जावा अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती.

पुढे स्वत: या कामाची धुरा सांभाळताना त्यांनी दामोदर खोरे महामंडळ तसेच सोन नदी आणि महानदी नियोजनात मोलाचे कार्य उभे केले. ओरिसामध्ये हिराकुड धरण प्रकल्पाने केवळ पूरसमस्या संपवली असे नव्हे तर ऊर्जा निर्मितीसह सिंचनाचे उद्दिष्ट साध्य करून या भागाचा पूर्ण कायापालट केला असं म्हणता येईल. कोसी नदी, चंबल नदीबाबत देखील याच दृष्टिकोनातून काम करण्यात आले.

**प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

केंद्र स्तरावरील पाणी धोरण असो अथवा जल ऊर्जा धोरण यातील डॉ. आंबेडकर यांचे कार्य अतुलनीय असेच आहे. पाणी धोरणानुसार आंतरराज्य पाणी वादात तोडगा काढणारा लवाद देखील तितकाच महत्त्वाचा आहे. आज ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर आधीच अनिश्चित असणाऱ्या मोसमी हवामानावर परिणाम झाला आहे. प्रजन्यवृष्टीचे प्रमाण आणि कालावधी यात झपाट्याने बदल होताना दिसत आहे. दुसऱ्या बाजूला ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करण्याची वेळ आली त्यासाठी नैसर्गिक ऊर्जा पर्याय असणाऱ्या जलविद्युत निर्मितीचे महत्त्व आज अनन्यसाधारण बनले आहे. भारतासारख्या अविस्तीर्ण आणि कृषी आधारित अर्थव्यवस्थेसाठी जलव्यवस्थापन हाच प्रगतीचा मोठा मार्ग आहे आणि त्याबाबत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार आणि संकल्पना व त्याबाबत केलेले कार्य अत्यंत आवश्यक आणि महत्वाचे ठरते. त्याची आवश्यकता दिवसागणिक जाणवते. अभ्यासू वृत्तीने प्रश्नांचे मूळ शोधून त्यांचे डॉ. आंबेडकर यांनी शोधलेले उत्तर त्यासाठीच मोलाचं आहे.

# उद्धारली कोटी कुळे , भीमा तुझ्या जन्मामुळे....

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल रोजी जयंती त्यानिमित्त त्यांना विनम्र आभिवादन.

कोकणातील आंबवडे गावातील रामजी मालोजी आंबेडकर (सपकाळ) हे ब्रिटिश सैन्यात सुभेदार असल्याने, ते मध्यप्रदेश राज्यातील इंदोर शहराजवळील महू (आजचे डॉ.आंबेडकर नगर) या लष्करी छावणीमध्ये नोकरीनिमित्त राहत असत. याच महूमध्ये रामजी आंबेडकर यांच्या पत्नी भिमाबाई यांनी १४ एप्रिल १८९१ रोजी एका तेजस्वी बालकास जन्म दिला. बालकाचे नामकरण भीमराव असे करण्यात आले. भीमराव अडीच वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब दापोलीला व काही दिवासानंतर सातारा येथे स्थाईक झाले, त्यामुळे भीमरावांचे बालपण तिथेच गेले. इ.स. १८९६ मध्ये भीमरावांच्या आईचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्या वेळी भीमराव पाच वर्षाचे होते. इ.स.१९०४ मध्ये भीमरावांचे कुटुंब मुंबईला स्थाईक झाले. भीमरावांचे शिक्षण सुरू असतानाच इ.स. १९०६ मध्ये त्यांचा विवाह दापोलीच्या रमाबाई वलंगकर यांच्याशी झाला.



भीमराव हे जरी हिंदू असले तरी जातीने महार असल्याने त्यांना त्याकाळी अस्पृश्य समजल्या जायचे, यामुळे त्यांना शिक्षण घेताना ही फार अडचणी येत. अशा परिस्थितीमध्ये भीमराव इ.स. १९०७ साली एल्फिस्टन हायस्कुल, मुंबई येथुन मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण झाले. अर्थिक अडचणींमुळे भीमरावांना पुढील शिक्षण घेण्यास अडचणी येणार होत्या, पण भीमरावांची शिक्षणाप्रती आवड बघून कृष्णाजी केसुळकरांनी भीमरावांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्तीची व्यवस्था करून दिली. या शिष्यवृत्तीमुळे भीमरावांनी बी.ए.अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. इ.स.१९१२ मध्ये भीमरावांनी मुंबई विद्यापिठातून पदवी संपादन केली. पदवीधर झाल्यानंतर भीमरावांनी बडोदा संस्थानात नोकरीस सुरूवात केली. नोकरीवर रुजु झाल्यानंतर काही दिवसांनी भीमरावांच्या पत्नी रामाबाई यांनी एक बालकास जन्म दिला. भीमराव आता वडिल झाले. त्यांनी मुलाचे यशवंत असे नामकरण केले. मुलाच्या जन्माच्या वर्षभरातच भिमरावांचे वडील रामजी आंबेडकर यांचे निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर काही दिवसांनी भीमरावांनी उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याचे ठरवले, यासाठी त्यांनी पुन्हा बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्ती घेतली. भीमरावांनी अमेरिकेच्या कोलंबीया विद्यापिठात उच्चशिक्षणासाठी प्रवेश घेतला. भीमरावांनी कोलंबीया विद्यापिठातुन अर्थशास्त्र विषयांत एम.ए.ची पदवी प्राप्त केली. याच विद्यापिठातून इ.स.१९१६ मध्ये भिमरावांनी पीएच.डी साठी कोलंबीया विद्यापिठात प्रबंध सादर केला. तो विद्यापिठाने स्विकारला. भीमरावांनी भारतातील विद्यार्थ्यांची दखल अमेरीकेच्या विद्यापिठांना घेण्यास भाग पाडले. पीएच.डी. झाल्यामुळे भीमराव आता डॉक्टरेट झाले होते. त्यांना आता सगळे डॉ.भीमराव म्हणू लागले. पुढे लंडन विद्यापिठाने भीमरावांची बुद्धिमत्ता पाहून त्यांना थेट एम.एस्सीला प्रवेश दिला. परंतू भीमरावांची शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने त्यांना लंडन मधील शिक्षण पुर्ण न करता भारतात परतावे लागले.

इ.स.१९१७मध्ये भीमरावांनी भारतात येवून पुन्हा बडोदा संस्थानात नोकरी सुरू केली. भीमराव अस्पृश्य जातीतील असल्याने भीमरावांना त्यांचे सहकारी अयोग्य वागणुक देत असे, तसेच अस्पृश्य असल्याने त्यांना बडोद्यात कोणी राहायला जागा न दिल्याने त्यांनी ती नोकरी सोडून मुंबईत येण्याचा निर्णय घेतला. इ.स. १९१८ मध्ये भीमरावांची मुंबईतल्या सरकारी महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात आली. इ.स.१९२० साली त्यांनी मुकनायक नावाचे पाक्षिक सुरू केले. तसेच त्यांनी कोल्हापुर संस्थानातील माणगावात भरलेल्या अस्पृश्यांच्या आधिवेशनाचे अध्यक्षपद देखील भुषवले. पुढे नोकरी सोडून भीमरावांनी लंडनमध्ये राहिलेले शिक्षण पुर्ण करण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी त्यांना कोल्हापुरचे राजर्षी शाहू महाराज यांनी मदत केली. इ.स.१९२१ मध्ये भीमरावांनी लंडन विद्यापिठातून एम.एस्सी पदवी प्राप्त केली. त्यांनी इ.स.१९२३ मध्ये डि.एस्सी. ही उच्चपदवी देखील मिळवली. भीमराव बॅरिस्टर झाल्यानंतर भारतात परतले. त्यांनी मुंबईमध्ये वकिलीस सुरवात केली. शिवाय लॉ कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करण्यास सुरूवात केली. इ.स.१९२६ मध्ये भीमरावांच्या अध्यक्षतेखाली रहिमतपुरमध्ये महार परिषदेचे अधिवेशन घेण्यात आले. यामध्ये त्यांनी तत्कालीन ब्राम्हण विचारसरणीपासून अस्पृश्य समाजाला दूर राहण्यास सांगितले. १ जानेवारी १९२७ मध्ये भिमरावांनी भिमा कोरेगावातील विजयी स्तंभाला मानवंदना दिली. याच वर्षी त्यांनी हिंदू मंदिरांमध्ये प्रवेश व अस्पृशांना सार्वजनिक ठिकाणचे पाणी मिळण्यासाठी आंदोलने केली. महाड येथील चवदार तळ्यातील पाणी भीमरावांनी प्राशन केले. हिंदू समाजात राहून अस्पृशांना न्याय मिळत नसल्याचे बघून भीमरावानी धर्मांतरण करण्याचे ठरवले. त्यांनी भगवान बुद्धांचे विचार अंगीकारून त्यांनी १९५६ मध्ये बौध्द धर्म स्विकारला.

आंबेडकरांनी दलित, अस्पृश्यांच्या उच्चशिक्षणसाठी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची देखील स्थापना केली. डॉ.आंबेडकरांनी पुढे भारत स्वांतत्र्य झाल्यानंतर भारत सरकारमध्ये कामगार मंत्री म्हणुन शपथ घेतली. या पदाचा उपयोग करत त्यांनी कामगारांसाठी अनेक योजनांची निर्मिती केली. तसेच आंबेडकरांची बुद्धीमत्ता पाहून त्यांच्याकडे मसुदा समितीचे अध्यक्षपद देवून संविधान निर्मितीची जबाबदारी देण्यात आली. जबाबदारी अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडत डॉ. आंबेडकरांनी भारत देशासाठी आदर्श संविधानाची निर्मिती केली. अशा या महामानवाचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. डॉ.आंबेडकर एक आदर्श व्यक्तीमत्व होते.त्यांनी आपल्या जीवनामध्ये शिक्षणाला फार महत्व दिले,तसेच त्यांनी तत्कालिन समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी देशाला दिलेल्या आदर्श संविधानामुळे तसेच अस्पृश्यांचे न्याय, हक्क व समतेसाठी दिलेल्या लढामुळे अनेक घरांतील मुले-मुले शिक्षित झाली. यामुळेच म्हणावेसे वाटते; उद्धारली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे.....

**राहुल मधुकर नवपुते**
मो.९११२२६१८१७

## पान १वरून...

### अजितदादांनीच आधी

म्हणजे राणा जगजितसिंह अजित पवारांचे भाचे लागतात. २०१९ ला पद्मसिंह पाटील कुटुंबानं भाजपात प्रवेश केला. २०२३ ला अजित पवारांचा गट सत्तेत भाजपसोबत गेला. आणि २०२४ ला राणा पाटलांच्या पत्नी अर्चना पाटलांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करुन तिकीट मिळवलं. २०१९ ला राष्ट्रवादी सोडून भाजप प्रवेश करताना राणा जगजितसिंहांना अश्रू अनावर झाले होते. शरद पवार दैवत आहेत, मात्र विकासासाठी भाजपात जात असल्याचे सांगितलेले होते. त्यामुळे अजितदादांनी आम्हाला भाजपात पाठवल्याचे मल्हार पाटील म्हणाले.मल्हार पाटील हे अर्चना पाटील यांचे पुत्र आहेत.

--------

### मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा शक्तिपीठ

शक्तिपीठ महामार्गास विरोध करण्यासाठी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील बाधित शेतकरी प्रतिनिधीची बैठक शनिवार (दि१३) रोजी परळी येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर धाराशिव या जिल्हातील प्रत्येक तालुक्यातून प्रमुख प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते. मराठवाड्यातील सहा जिल्ह्यातून हा शक्ती पीठ महामार्ग हळद, केळी, फळबागा, ऊस बागायत पट्ट्यातून हा महामार्ग प्रस्तावित आहे. हा महामार्ग खूप मोठ्या रुंदीचा असल्याकारणाने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपजाऊ जमीन ही शासन संपादित करणार असल्याने असंख्य शेतकरी भूमिहीन तसेच अत्यल्पभूधारक होणार आहेत. महामार्गाच्या नावाखाली शासन शेती संपादित करून मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे जगण्याचे साधन कायम नष्ट करणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचा वातावरण आहे. सदरील भागामध्ये सिंचनाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने बाधित शेतकऱ्यांबरोबर इतर शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होणार आहे तसेच शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर, शेतकऱ्यांना सेवा देणारे इतर व्यवसायिक यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे. याच मार्गावर अगोदरच तयार असलेला नागपूर - रत्नागिरी महामार्ग असताना हा नवीन महामार्ग कशासाठी असा प्रश्न आता या भागातील शेतकरी आणि नागरिक उपस्थित करीत आहेत. या गंभीर प्रश्नावर शनिवार (दि.१३) रोजी परळी येथे मराठवाड्यातील ज्या जिल्ह्यातून हा महामार्ग प्रस्तावित आहेत त्या जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील प्रमुख शेतकरी प्रतिनिधी यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्रामुख्याने होऊ घातलेला पवणार ते पत्रादेवी शीघ्र दृतगती (शक्तिपीठ) महामार्ग कायमचा रद्द करण्यात यावा. नागपूर ते मुंबई समृद्धी दृतगती महामार्ग मध्ये बाधित झालेल्या शेतकरी तसेच आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे गावांचे त्रयस्थ संस्थेकडून सामाजिक सर्वेक्षण करण्यात यावे. आणि त्याचा जशास तसा अहवाल प्रसारित करण्यात यावा. पवणार ते पत्रादेवी शीघ्र दृतगती महामार्ग (शक्तिपीठ) महामार्ग क्रमांक १० बाबत निघालेले सर्व परिपत्रके रद्द करण्यात यावीत. हे प्रमुख तीन ठराव यावेळी एकमुखाने मंजूर करण्यात आले. शासनाने शेतकरी विरोधी हा शक्ती पीठ महामार्ग प्रकल्प रद्द करावा, जबरदस्तीने हा प्रकल्प लादायांचा असेल तर आमच्या प्रेतावरून हा प्रकल्प न्यावा, अशा तीव्र स्वरूपाच्या भावना यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या.

सदरील महामार्गामध्ये मराठवाड्यातील अत्यन्त उपजाऊ जमीन जात आहे. त्यामुळे असंख्य शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. जलसंधारण तसेच नदीजोड सारखे प्रकल्पाना शासनाने प्राथमिकता दिली पाहिजे. सुपीक जमिनी घेऊन महामार्ग बांधणे योग्य नाही

**- गजेंद्र येळकर,शेतकरी, लातूर.**

मी जालना - नांदेड समृद्धी महामार्ग मध्ये बाधित शेतकरी असून शक्तिपीठ महामार्ग मध्ये माझी खूप जास्त जमीन जाणार आहे. नांदेड-जालना महामार्ग मध्ये मला शासनाकडून अल्प मोबदला मिळत असल्याने आमचे पुनर्वसन शक्य नाही. आमच्या भागात जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत.

**- गोविंद घाटोळ, बाधित शेतकरी ,परभणी.**

---------------

### पंकजा मुंडेंसाठी धोक्याची घंटा

आपण या ठिकाणी जाणून घेणार आहोत. टी. पी. मुंडे यांनी रेनापुर आणि परळीमधून तीन विधानसभा निवडणुकांमध्ये किती मते घेतली हे आपण या ठिकाणी जाणून घेणार आहोत, याबरोबरच बीड लोकसभा निवडणुकीमध्ये मोठ्या पक्षाचे दोन उमेदवार असताना जर ओबीसी उमेदवार निवडणुकीत उतरला तर काय होते, हेही आपण जाणून घेणार आहोत. दोन बीड लोकसभा निवडणुकांमध्ये अशाच दोन ओबीसी चेहऱ्यांनी धक्कादायक निकाल लावले होते, नेमके ते दोन चेहरे कोण आहेत हे आपण या ठिकाणी जाणून घेणार आहोत, भाजपने पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडून ज्योती मेटे यांची उमेदवारी येईल असं वाटत असतानाच अचानकपणे नाट्यमय घडामोडी घडल्या. अजित पवारांच्या गोटात असलेले बजरंग सोनवणे यांनी शरद पवारांची तुतारी हाती घेतली. त्यानंतर ज्योती मेटे की बजरंग सोनवणे अशा चर्चा उमेदवारीबाबत रंगल्या. मात्र शेवटी बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहीर झाली. उमेदवारीचा सस्पेन्स संपल्यानंतर पंकजा आणि बजरंग सोनवणे यांची सरळ सरळ लढत होईल असं वाटत होतं, मात्र अचानक पणे वंचित बहुजन आघाडीने मराठा चेहरा पुढे करीत सातत्याने मराठा आंदोलनामध्ये अग्रेसर असलेले अशोक हिंगे यांना प्रकाश आंबेडकरांनी बीडमधून उमेदवारी दिली. त्यामुळे तिरंगी लढत होईल असे चित्र स्पष्ट झाले असतानाच शुक्रवारी ओबीसी बहुजन पार्टीच्या वतीने बीडमध्ये पत्रकार परिषद घेऊन ओबीसी नेते टीपी मुंडे यांना बीडमधून उमेदवारी जाहीर केली. त्रिंबक उर्फ टीपी मुंडे हे परळीमधील सर्व परिचित असे नेतृत्व आहे. अगोदर काँग्रेस त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शेवटी भाजप असा त्यांचा राजकीय प्रवास राहिलेला आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या विरोधात रेणापुर मतदार संघातून एक वेळा तर पंकजा मुंडे यांच्या विरोधात परळी मतदारसंघातून दोन वेळा विधानसभा निवडणूक ते लढलेले आहेत. ओबीसी- मराठा संघर्षामध्ये छगन भुजबळ यांच्या सभांमधून टीपी मुंडे यांनी लक्षवेधी भाषणे केली होती. आक्रमक वक्ते आणि धाडसी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. टि.पी. मुंडे यांच्या उमेदवारीमुळे आता चौरंगी निवडणुक होणार असून दोन ओबीसी आणि दोन मराठा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. टि.पी. मुंडे यांचा पंकजा मुंडे यांनाच सर्वाधिक फटका बसू शकतो.

--------------

### संदेशखाली येथील हिंसाचाराच्या चौकशीसाठी

मानवाधिकार आयोगाच्या या शिफारशी समोर आल्याने राज्य सरकारपुढील अडचणी वाढण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखाली येथील हिंसाचार आणि महिलांवर लैंगिक अत्याचारांच्या घटनेने खळबळ उडाली होती. प्रसारमाध्यमांमध्ये या घटनेची वाच्यता झाल्यानंतर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने २१ फेब्रुवारीला याची दखल घेऊन चौकशी पथक नेमले होते. पश्चिम बंगाल पोलिसांनी या घटनाक्रमात २५ गुन्हे नोंदविल्याचे आणि त्यातील ७ प्रकरणे महिलांवरील लैंगिक अत्याचारांशी संबंधित होती असे आयोगाला कळविले होते. या सा-या घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर मानवाधिकार आयोगाच्या पथकाने संदेशखाली येथील हिंसाचाराची घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यानंतर तेथे झालेल्या मानवाधिकारांच्या उल्लंघनाबद्दल चिंता व्यक्त करणारा अहवाल शनिवारी प्रसिद्ध केला.

या अहवालात, सरकारी यंत्रणांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे मानवाधिकारांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. पश्चिम बंगालचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक यांना हा अहवाल पाठविण्यात आला असून मानवाधिकार आयोगाने केलेल्या सर्व शिफारशींवर आठ आठवड्यांच्या आत कृती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.यासोबतच आयोगाचा पाहणी अहवालही व्यापक प्रसारासाठी राज्य सरकारच्या संकेत स्थळांवर प्रसिद्ध करण्यासही सांगितले आहे.

----------------

### काँग्रेसचे सरकार आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी

प्रधानमंत्री कार्यालयाने तयार केलेली योजना आहे. लघुउद्योगावर लावलेली जीएसटी रद्द करणार, एकच टॅक्स प्रणाली राहणार. शेतकरी वर्गावरही लादलेला १८ टक्के जीएसटी आम्ही रद्द करणार, गरीब कुटुंबातील एका महिलेला दरवर्षी एक लाख रुपये देणार, तरुणांसाठी अप्रेंटिस योजना लागू करणार, सरकार नोकरीभरती खासगी नव्हे, तर सरकारी यंत्रणेमार्फत राबविणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी मंचावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार चंद्रकांत हांडोरे, माजी आमदार माणिकराव ठाकरे, आमदार अभिजित वंजारी, पूर्व विदर्भातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार विकास ठाकरे, नामदेव किरसान, प्रतिभा धानोरकर, श्यामकांत बर्वे आदी मान्यवर उपस्थित होते.

**राष्ट्रपती आदीवासी असल्याने उद्घाटनाला बोलावले नाही**

देशाच्या प्रथम व्यक्ती असलेल्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू या आदिवासी समाजातील असल्यामुळेच त्यांना राममंदिराच्या शुभारंभप्रसंगी निमंत्रित करण्यात आले नाही. कारण त्या आदिवासी समाजाच्या आहेत, फक्त धर्माच्या नावावर जनतेला भ्रमित करण्याचे काम केंद्रातील सरकार करीत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील उद्योगपतींकरीता हा देश चालविला असून त्याचा लाभ मोजक्या उद्योगपतींना होत आहे. जेव्हा जेव्हा मोदींचे सरकार येते तेव्हा तेव्हा अदानींसारख्या उद्योगपतींचे शेयर मुल्य वाढते. त्यामुळे हे सरकार अदानीचे सरकार असल्याची टीका त्यांनी केली.

------------

### संत-महंतांच्या उपस्थितीत सप्ताहाची पुष्पवृष्टी हिवरा पहाडी येथे मच्छिंद्रगडाचा नारळी सप्ताह



**शिरूर । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र संस्थान मच्छिंद्रगडाचा ४७ वा फिरता नारळी सप्ताह बीड तालुक्यातील मौजे हिवरा पहाडी येथे आयोजित करण्यात आला असून या सप्ताह आरंभाची पुष्पवृष्टी संत महंतांच्या उपस्थितीत झाली असून या पुष्पवृष्टीच्या कार्यक्रमाला पंचक्रोशीतून नव्हे तर बीड गेवराई शिरूर तालुक्यातून भाविक -भक्तांनी उपस्थिती लावली होती.**

बीड जिल्ह्यातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचे मठाधिपती वै.महंत स्वामी निगमानंद महाराज व वै. धोंडीराम महाराज त्यांच्या प्रेरणेने गेल्या ४७ वर्षापासून गडाचा फिरता नारळी सप्ताह दरवर्षी वेगवेगळ्या गावामध्ये आयोजित केला जात आहे. यावर्षीचा हा सप्ताह श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे विद्यमान मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बीड तालुक्यातील हिवरा पहाडी या गावी ग्रामस्थांच्या आयोजनातून आयोजित करण्यात असून, ग्रामस्थांच्या वतीने गेल्या वर्षभरापासून सप्ताहाची पूर्वतयारी मोठ्या जमाने चालू होती. आज सप्ताहाची पुष्पवृष्टी म्हणून पंचक्रोशीतील साधुसंत,भाविक -भक्त आज हिवरा पहाडी या गावी येणार आणि आपणाला दर्शन सोहळा लाभणार यामुळे अगदी आज सकाळपासूनच गावांमध्ये आनंदाचे वातावरण होते. आलेल्या संत- महंतांचे, भाविक भक्तांचे स्वागत करण्यासाठी स्वागत करण्यासाठी गावकरी सज्ज झाले होते. महंत जनार्दन महाराज यांच्या आगमनानंतर गावकऱ्यांच्या वतीने महाराजांची गावभर रथामधून मिरवणूक काढण्यात आली होती आलेल्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांचे गावकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. ब्रह्मवृद्धांच्या मंत्र उच्चाराने, हजारो भाविक भक्तांच्या साक्षीने आज हिवरापाडी येथे सप्ताह आरंभाची पुष्पवृष्टी करण्यात आली आहे . यावेळी महंत जनार्दन महाराज यांच्यासह महंत नवनाथ महाराज शास्त्री, महंत रामेश्वर महाराज शास्त्री, महंत उद्धव महाराज शास्त्री, हनुमान महाराज शास्त्री,परशुराम महाराज मराडे, तीर्थराज महाराज पठाडे, एकनाथ महाराज गाडे, पुरुषोत्तम महाराज, महेशदेवा महाराज शास्त्री, अच्युत महाराज नशिकेत महाराज जरे, लक्ष्मण महाराज जरांगे आदी संत महंतासह ॲड. जयंत राख,डॉ. विष्णू सोनवणे, रमेश तळेकर, अर्जुन खेडकर आदींसह मोठ्या संख्येने मान्यवरांची उपस्थिती होती.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ ३

## पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात रमजान ईद उत्साहात साजरी

पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी- अंमळनेर-कोतन तसेच खोपटी येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन ईद सणाच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या.पिंपळवंडी येथे मागील काही वर्षांपासून सामुदायिक शिरखुर्मा,गुलगुले पदार्थ सेवनाचा उपक्रम राबविला जात आहे.प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी येथील मुस्लिम बांधवांनी हिंदू बांधवांसाठी मज्जिद जवळील सभागृहात सामुदायिक शिरखुर्मा व गुलगुले सेवनाचे आयोजन केले होते.त्याचा हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आस्वाद घेतला.या कार्यक्रमात पिंपळवंडी व परिसरातील सर्व जाती-धर्मातील लोकांनी मोठ्या संख्येने शिरखुर्मा व गुलगुले खाण्याचा आनंद लुटला.यासाठी शेख युसुफ सर, लियाकत राज,शेख बाबासाहेब,सय्यद इसाक,शेख शफीक,शेख जाणू, अकील शेख,बशीर शेख,शाबुद्दीन शेख,सय्यद शाबुद्दिन,इस्लाम शेख,चांद भाऊसाहेब शेख व सर्व तरुण युवकांनी परिश्रम घेतले.



# द्रुतगती महामार्गापेक्षा मराठवाड्यात सिंचन अनुशेष पूर्ण करणारा प्रकल्प राबवा

## शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प रद्द करा अथवा शेतकऱ्यांच्या प्रेतावरून बनवा-संतप्त भावना

**परळी । प्रतिनिधी**

मराठवाड्यात अगोदरच सिंचनाखाली जमीन कमी आहे. त्यातच पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्ग नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून जात असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवाड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत.यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ महामार्गास विरोध करण्यासाठी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यातील बाधित शेतकरी प्रतिनिधीची बैठक शनिवार (दि१३) रोजी परळी येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर धाराशिव या जिल्हातील प्रत्येक तालुक्यातून प्रमुख प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते.



मराठवाड्यातील ज्या सहा जिल्ह्यातुन हा शक्ती पीठ महामार्ग हळद, केळी, फळबागा, ऊस बागायत पट्ट्यातून हा महामार्ग प्रस्तावित आहे. हा महामार्ग खूप मोठ्या रुंदीचा असल्याकारणाने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उवजाऊ जमीन ही शासन संपादित करणार असल्याने असंख्य शेतकरी भूमिहीन तसेच अत्यल्पभूधारक होणार आहेत. मराठवाडा जिथे नेहमीच शेतकऱ्यांना अस्मानी आणि सुलतानी संकटाचा सामना करत आपली उपजीविकेचे साधन असलेली शेती ह्या महामार्गाच्या नावाखाली शासनाकडून संपादित करून मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे जगण्याचं साधन कायम नष्ट होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचा वातावरण आहे. सदरील भागामध्ये सिंचनाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने बाधित शेतकऱ्यांबरोबर इतर शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होणार आहे तसेच शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर, शेतकऱ्यांना सेवा देणारे इतर व्यवसायिक यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे.

**मराठवाड्यातील सर्व बाधित जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधींची परळीत बैठक**

ह्याच मार्गावर अगोदरच तयार असलेला नागपूर रत्नागिरी महामार्ग असताना हा नवीन महामार्ग कशासाठी असा प्रश्न आता या भागातील शेतकरी आणि नागरिक उपस्थित करीत आहेत.या गंभीर प्रश्नावर शनिवार (दि १३ ) रोजी परळी येथे मराठवाड्यातील ज्या जिल्ह्यातून हा महामार्ग प्रस्तावित आहेत त्या जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील प्रमुख शेतकरी प्रतिनिधी यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्रामुख्याने १)होऊ घातलेला पवणार ते पत्रादेवी शीघ्र दृतगती (शक्तिपीठ)महामार्ग कायमचा रद्द करण्यात यावा. २)नागपूर ते मुंबई समृद्धी दृतगती महामार्ग मध्ये बाधित झालेल्या शेतकरी तसेच आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे गावांचे त्रयस्थ संस्थेकडून सामाजिक सर्वेक्षण करण्यात यावे. आणि त्याचा जशास तसा अहवाल प्रसारित करण्यात यावा.३)पवणार ते पत्रादेवी शीघ्र दृतगती महामार्ग (शक्तिपीठ) महामार्ग क्रमांक १० बाबत निघालेले २८/२/२०२४, ७/३/२०२४ रोजी निघालेले व इतर सर्व परिपत्रके रद्द करण्यात यावीत.हे प्रमुख तीन ठराव यावेळी एकमुखाने मंजूर करण्यात आले आहे.शासनाने शेतकरी विरोधी हा शक्ती पीठ महामार्ग प्रकल्प रद्द करावा, जबरदस्ती ने हा प्रकल्प लादायांचा असेल तर आमच्या प्रेतावरून हा प्रकल्प न्यावा. अशा तीव्र स्वरूपाच्या भावना यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त करून दाखवल्या.

सदरील महामार्गामध्ये मराठवाड्यातील अत्यन्त उपजाऊ जमीन जात आहे. त्यामुळे असंख्य शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.जलसंधारण तसेच नदीजोड सारखे प्रकल्पाना शासनाने प्राथमिकता दिली पाहिजे. सुपीक जमिनी घेऊन महामार्ग बांधणे योग्य नाही.
गजेंद्र येळकर शेतकरी, लातूर.

मी जालना - नांदेड समृद्धी महामार्ग मध्ये बाधित शेतकरी असून शक्तिपीठ महामार्ग मध्ये माझी खूप जास्त जमीन जाणार आहे. नांदेड- जालना महामार्ग मध्ये मला शासनाकडून अल्प मोबदला मिळत असल्याने आमचे पुनर्वसन शक्य नाही. आमच्या भागात जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत.
गोविंद घाटोळ बाधित शेतकरी ,परभणी.

शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या नावाखाली शेतकऱ्यांची सुपीक जमीन कवडीमोल भावात संपादित करून कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे काम हे केंद्र आणि राज्य सरकार करत आहे.महामार्गापेक्षा मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे कट कारस्थान सरकार कडून सुरू आहे.
एड.अजय बुरांडे शेतकरी नेते, बीड

## महात्मा ज्योतिबा फुलेंनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली - प्रा.गौतम गायकवाड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिनांक ११ एप्रिल २०२४ ''क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुलेंनी दि. ३ ऑगस्ट १९४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली व स्त्रियांना शिक्षणाची दारे जी अनेक वर्षांपासून बंद होती ती खुली केली. या माध्यमातूनच त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली,'' असे प्रतिपादन प्रा.गौतम गायकवाड यांनी केले. ते आज महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त खोलेश्वर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष श्री.राम कुलकर्णी हे उपस्थित होते तर मंचावर उपप्राचार्य प्रा.डॉ.सुभाष पटेकर,प्रा.डॉ. दिगंबर मुडेगावकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रारंभी सर्व उपस्थित मान्यवरांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. आपल्या सविस्तर मार्गदर्शनात प्रा. गायकवाड म्हणाले की महात्मा फुले यांनी नेहमीच शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. समाजातील सर्वच उपेक्षित, वंचित घटक, स्त्रिया या शिक्षणाच्या प्रवाहात आणल्या गेल्या पाहिजेत ही त्यांची धारणा होती. पुढील काळात त्यांनी पुण्यामध्येच विविध ठिकाणी मुलींसाठी शाळा सुरू केल्या तर प्रौढांसाठी १९५५ मध्ये देशातील पहिली रात्र शाळा स्थापन केली. शिक्षण क्षेत्रात त्यांनी अनेक अमुलाग्र बदल घडवून आणले, सती प्रथेविरुद्ध देखील त्यांनी आवाज उठवला. समाजातील उपेक्षित व दिन दलितांना न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची तळमळ होती. यासारखीच इतरही अनेक महान कार्य त्यांच्या हातून घडली म्हणूनच सन १८८८ मध्ये मुंबई येथे झालेल्या सभेत जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली असे प्रा.गौतम गायकवाड यांनी प्रतिपादित केले. अध्यक्षीय समारोप करताना राम कुलकर्णी म्हणाले की महात्मा फुलेंचे शैक्षणिक व सामाजिक कार्य खूप मोठे आहे.त्यांनी शिक्षण व्यवस्था सर्व समाजापर्यंत पोहोचवली व त्यामुळे अनेक लोक, स्त्रिया या शिक्षणाच्या प्रवाहात आल्या, त्यांच्या कार्यास मी अभिवादन करतो असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जिजाराम कावळे यांनी केले तर आभार प्रा.डॉ. बा.बा. कागदे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धार्मिक कार्यक्रमात शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन; कासारीकरांचा अभिनव उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कासारी येथे त्रिदिवशीय किर्तन महोत्सव व लक्ष्मण शक्ती या धार्मिक कार्यक्रमात येथे इ.५ वी ते ६ वी व इ.७ वी ते ८ वी या दोन गटात शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. १०६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. धार्मिक कार्यक्रमात शिष्यवृत्ती परीक्षेचा अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कासारी येथील ग्रामस्थांनी धार्मिक कार्यक्रमात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवचेतना मिळावी या उद्देशाने शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन शुक्रवारी केले होते. स्पर्धा परीक्षेचे तज्ञ गणेश होरमाळे, उत्तरेश्वर बापमारे यांनी गणित या विषयावर आधारित प्रश्न संचिका तयार केली होती. परीक्षेचा निकाल शनिवारी घोषित करण्यात आला. पाचवी ते सहावी या गटात यादव अंकिता गजानन प्रथम क्रमांक, कराड कार्तिक प्रल्हाद द्वितीय क्रमांक, फड दीप संभाजी तृतीय क्रमांक तर इयत्ता सातवी ते आठवी या गटातून प्रथम क्रमांक सोळंके भक्ती अंगद, द्वितीय क्रमांक सोळंके सायली संतोष व तृतीय



क्रमांक बडे सिद्धांत बळीराम या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ३००१, २००१, १००१ रुपये रोख व सन्मान चिन्हाचे वाटप आयोजकांच्या वतीने करण्यात आले. युवा नेते भागवत दराडे, महाराष्ट्र पोलीस विष्णू घोळवे, संभाजी फड यांनी या बक्षिसांसाठी पुढाकार घेतला होता.बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमास माजी अर्थ व बांधकाम सभापती जयसिंग सोळंके व जैतापूरचे सरपंच भागवत दराडे,कासारीचे सरपंच दौलत बडे, कारीचे सरपंच दीपक मोरे,अमित राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी धार्मिक कार्यात शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केल्याबाबत आयोजकांचे कौतुक करण्यात आले.

## प्रकाश शिंदे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील खरात आडगाव



येथील रहिवाशी प्रकाश शिंदे यांचे राहत्या घरी दि.१२ एप्रिल शुक्रवार रोजी पहाटे ०५:३० वाजेच्या दरम्यान तीव्र हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समय त्यांचे वय ५२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. यांच्या निधनामुळे खरात आडगाव गावासह पंचक्रोशीसह हळहळ व्यक्त करत आहे.

## कवडगाव परिसरात वादळी वाऱ्यासह व गारांसह धुव्वाधार पाऊस; तोंडी आलेला घास हिराऊन नेला

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव बु. येथे काल अवकाळी पावसाने धुमाकूळ घालत सोसाट्याच्या वारा गारा आणि मुसळधार पाऊस या मुळे मोठे नुकसान झाले आहे तब्बल २तास चालणार्या या नैसर्गिक आपत्ती मुळे जनजिवन विस्कळीत झाले आहे या आपत्तीत शेतकरी पुरता संपला आहे तरी शासनाने तत्काळ मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी कि वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथे काल दुपारी ४वाजेपासून ते ६वाजेपर्यंत आणखी रात्री ९वाजेपर्यंत अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला या पावसात प्रचंड वारे गारा यांचा समावेश होता या मुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभी असणारी ज्वारी बाजरी गहु हरभरा फळबागा त्यांत मुख्यत्वे शेतकर्यांचे आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे या सह भाजीपाला या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात झळ पोहोचली आहे एकिकडे दूष्काळ आणखी दुसरीकडे ही नैसर्गिक आपत्ती या दुहेरी संकटात बळीराजा सापडला आहे

अचानक आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील जनजीवन विस्कळित झाले आहे गावात



अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे विजेचे खांब कोसळल्यामुळे परिसरातील अनेक गावांत अंधार पसरला आहे काल शेतकरी कुटुंबातील सदस्य अनेकजण शेतात होते यावेळी अचानक आलेल्या पावसामुळे अनेक जण आपला जीव मुठीत धरून मिळेल त्या निवार्याखाली आश्रय घेत होते सुदैवाने जिवीत हानी झाली नाही परंतु काळ आला होता परंतु वेळ आली नव्हती अशीच अवस्था सर्व शेतकर्यांची झाली होती.या नैसर्गिक आपत्ती मुळे शेतकरी व जनसामान्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली तरी मायबाप निवडणुकीच्या नादात असणार्या सरकारने या कडे लक्ष देऊन आपत्ती हे ग्रस्तांना कुठलेही पंचनामे न करता तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी होत आहे.

## राष्ट्रनिर्माणसाठी समर्पित वृत्तीने कार्य केले पाहिजे - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.इंगोले

### राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव ; भव्य मिरवणूकीचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त या दोन्ही राष्ट्रपुरूषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक अंबाजोगाई येथे काढण्यात आली. या संयुक्त जयंती महोत्सवाचे हे तिसरे वर्ष होते अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष नितीन सरवदे, सचिव धम्मपाल मोरे यांनी दिली.

यावेळी मोठ्या उत्साहात सांस्कृतिक पद्धतीने विविध कला गुणांचे सादरीकरण करीत ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीची सुरूवात संयुक्त जयंती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष तथा इंडीयन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक विभागाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले व



जयंती महोत्सवाचे समन्वयक विकास अधिकारी ईश्वरअण्णा जोगदंड यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले यांनी महापुरूष हे सर्वांनी अभ्यासून समजून घेऊन जीवनात आपले आचरण आणि व्यवहार त्याप्रमाणे घडवून घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करीत महापुरूषांचे विचार स्विकारून त्या मौलिक विचारांचे वारसदार होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. समाजातील काहींनी तसेच राजकीय व्यवस्थेने महापुरूषांना पद्धतशीरपणे जाती-जातीत वाटून त्याचा वापर आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी केला. हा धोका ओळखून आता तरी समाजाने एकत्र येऊन राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित वृत्तीने कार्य केले पाहिजे असे म्हणत जयंती यांस महामानवांची प्रतीके समजून त्या साजऱ्या झाल्या पाहिजेत असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. यावेळी अनेक महिला, युवती, विद्यार्थी आणि युवकांनी विविध सांस्कृतिक कलागुणांचे अप्रतिम सादारीकरण करीत उपस्थित जनसमुदायाची उत्स्फूर्त दाद मिळवली. मुलींची पारंपरिक लेझीम, काठी, नृत्याविष्काराणे उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. जयंती मिरवणूक यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव संयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रवर्तक डॉ.राजेश इंगोले, समन्वयक ईश्वर अण्णा जोगदंड, अध्यक्ष नितिन सरवदे, महिला पथक अध्यक्ष सुषमाताई वाघमारे, भावनाताई कांबळे, सचिव धम्मा मोरे , उपाध्यक्ष गोविंद मस्के, सहसचिव सुनिल कांबळे , अभिलाष बनसोडे, प्रशांत वेडे, कोंडिबा मोरे, ब्रिजेश इंगळे, लखन वैद्य, लक्ष्मण कसबे, समीर वेडे, अजय गोरे, शुभम मस्के, शाम सरवदे, विशाल कांबळे, प्रणित वाघमारे, राहूल सुरवसे, स्वप्निल सोनवणे, प्रकाश भालेराव, आकाश शिंदे, विशाल वेडे, शार्दुल वाघमारे, विकास वेडे, सरगम मस्के, मंगेश वैद्य, भैय्यासाहेब वेडे, अनिल कांबळे, दिपक पोटभरे, उज्ज्वल सोनवणे व इतर सदस्यांनी प्रयत्न करत हा उत्सव पार पाडला. या महोत्सवाचे थेट प्रक्षेपण ओन्ली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यु-ट्यूब चॅनेलचे सुनिल रोडे यांनी केले. जयंती उत्सव मिरवणुकीत ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# पवनचक्की ऊर्जाप्रकल्प कंपन्यांचा मनमानी कारभार; महाजनवाडीकर आंदोलनाच्या पवित्र्यात



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवनचक्की ऊर्जा प्रकल्प कंपन्यांनी धुमाकूळ घातला असुन शेतकऱ्यांची दिशाभूल करणे, संबंधित शेतकऱ्यांना कोणतीही पुर्वकल्पना न देताच त्यांच्या शेतजमीनीवर प्रकल्प उभारणे,विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देणे,अरेरावी करणं असे प्रकार सुरू असुन महाजनवाडी येथील ग्रामस्थांनी संबंधित प्रकरणात तहसीलदार, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक बीड यांना लेखी तक्रार करून जबरदस्तीने सुरू असलेले ऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने थांबविण्यात यावे अशी मागणी केली असुन दखल न घेतल्यास ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

पवनचक्की ऊर्जा प्रकल्पाकडुन

## विंड टर्बाईन सिंड्रोम आरोग्यास धोकादायक -डॉ.ढवळे

पवनचक्की ऊर्जा प्रकल्प डोंगराळ मानवी वसाहत नसलेल्या भागात राबविण्यात येणारा प्रकल्प आहे.पवनचक्या जवळ राहणा-या लोकांचे आरोग्य धोक्यात असुन विंड टर्बाईन सिंड्रोम आजाराची लक्षणे आढळुन येतात ज्यामध्ये डोकेदुखी,मळमळ,झोपेची समस्या,रात्रीची भिती,टिनिटस, चिडचिड, चिंता, एकाग्रता आणि स्मरणशक्तीच्या समस्या आणि समतोल आणि चक्कर येणं या समस्यांचा सामना करावा लागतो.त्यामुळे मानवी वसाहतीमध्ये प्रकल्प राबवण्यात येऊ नये याची खबरदारी जिल्हा प्रशासनाने घ्यायला हवी.

नियमांचे उल्लंघन- राजकर्ण घरत

महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६,४९७,४२१ व ५०१ मध्ये वडिलोपार्जित समाईक जमिन सर्वांच्या नावावर असुन सदरील समाईक शेत महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर सर्वांच्या नावावर आहे.शेतजमिनीचे आपसात तंतोतंत वाटप आजतागायत झालेले नाही. सदर कंपनीने शरद विनायक घरत व संतोष विनायक घरत यांच्याकडून पवनचक्की ऊर्जा प्रकल्पासाठी एकुण ६ एकर जमिन २८ वर्षे ११ महिन्यांसाठी भाडे तत्वावर दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे दस्त क्रमांक २२५६/२०२३ दिलेली आहे. मात्र प्रकल्पाच्या नियमानुसार अगोदर शासकीय मोजणी करून जागा ताब्यात घेऊन जागेचा करून संरक्षक कुंपण करून प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करणे बंधनकारक असताना जागा नावावर असलेल्या ६ पैकी ४ जणांना याची पुर्व कल्पना सुद्धा दिलेली नाही.कुठल्याही प्रकारची सहमती दिलेली नाही.एकंदरीतच शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आलेली असुन संबंधित प्रकरणात लेखी तक्रार जिल्हा प्रशासनाला दिलेली असुन वकिलामार्फत कंपनीला नोटीस पाठवण्यात आल्याचे राजकर्ण घरत यांनी सांगितले.

जीवाची काळजी वाटते:- शारदा घरत

पवनचक्की घराशेजारीच उभारण्यात आली असुन आमचे मुलं आणि आमच्या गुराढोरांना यापासून धोका असुन सारखी काळजी वाटते,लिंबागणेश येथील पवनचक्की पडल्यापासून तर सारखी भिती वाटते. आमच्या जीवाला घोर लागला असुन घरतवस्ती मध्ये ५० च्या आसपास लोकं रहात असुन हा प्रकल्प बंद करण्यात यावा अशी मागणी शारदा घरत यांनी केली आहे.

पशुधनाला धोका - गणेश जगदाळे

आम्ही बंदिस्त गोपालन केले असुन जवळपास सव्वाशे गाईचा सांभाळ करत दुधदुभत्याचा व्यावसाय कित्येक वर्षांपासून करत आहोत.मात्र या प्रकल्पामुळे भविष्यात पशुधनावर परीणाम होणार आहे. त्याच बरोबर १ किलोमीटर परिसरातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या सौर पंप,शेततलाव, जलसिंचन विहिर,गायगोठा, कुक्कुटपालन या शासकीय योजनांचा लाभ मिळणार नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असल्याचे गणेश जगदाळे यांनी सांगितले.

cmyk

# मराठवाड्यात अवकाळी पावसाचा हाहाकार

## चौघांचा मृत्यू; शेकडो हेक्टरवरील पिकांचे नुकसान

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांना मागील दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने झोडपून काढले आहेत. छत्रपती संभाजीनगरसह परभणी , जालना, नांदेड, हिंगोली, बीड जिल्ह्यातील अनेक भागांना वकाळी पाऊस, गारपीट, वादळाचा फटका बसला आहे. आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाला असून, शेकडो हेक्टरवरील ज्वारी, मका, बाजरी, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाड्यात प्राथमिक अंदाजानुसार अवकाळी पावसामुळे २ हजार ७१६ हेक्टर पिकांवरील नुकसान झाले आहेत. तर ७७७ हेक्टरवरील फळ पिकांचे झालं नुकसान झाले आहेत. अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान बीड जिल्ह्यात झाले आहे. मराठवाड्यात ८४ लहान-मोठी जनावर दगावली असून, ३५६ घरांची पडझड झाली आहे. गारपीटमुळे मराठवाड्यातील २०१ गाव बाधित झाली असून, ४ हजार ३०१ शेतकऱ्यांना गारपिटीचा फटका बसला आहे.



लातूर जिल्ह्यात फळबागांचे मोठं नुकसान

लातूर जिल्ह्यात तीन दिवस सातत्याने अवकाळीचा फटका बसत आला आहे. यामुळे जिल्हाभरात नऊ जनावर दगावली आहेत. तर, २५ एकर पेक्षा जास्त फळबागेचा आणि शेतीचं नुकसान झालं आहे. तसेच, जिल्ह्यात ९ जनावरे दगावली असून, लातूर आणि जळकोट तालुक्यातील काही ठिकाणी फळबागांचे नुकसान झालंय. या दोन तालुक्यात मिळून जवळपास २५ एकर क्षेत्रावरील फळबागांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाने दिली आहे. अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीचे आकडेवारी तात्काळ प्रशासनाकडे येत आहे. प्रशासन योग्य ती खबरदारी घेत असल्याची माहिती लातूरचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यात वीज पडून महिलेचा मृत्यू...

बीडच्या गेवराई तालुक्यातील मन्यारवाडी येथे वीज पडून एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून, यामध्ये पंधरा वर्षाचा मुलगा गंभीररित्या भाजला आहे. त्याच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मीना गणेश शिंदे असं या महिलेचे नाव असून, महिला आणि मुलगा दोघेजण शेतामध्ये काम करत असताना अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. यामध्येच मीना शिंदे यांच्या अंगावर विज पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर, त्यांच्या बाजूला असलेला ओमकार शिंदे हा पंधरा वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे.

परभणी दोघांचा मृत्यू, शेतीचे प्रचंड नुकसान

परभणी जिल्ह्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असून, सलग ३ दिवसांपासुन जिल्ह्यातील विविध भागात अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्याने नुकसान होत आहे. काल सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसात वीज पडून दोघांचा मृत्यू झाला, तर ६ जनावरांचा देखील मृत्यू झालाय. तसेच अनेक ठिकाणी आंबा फळबागांसह भाजीपाल्याचे नुकसानही झाले आहे. वीज पडून गंगाखेड तालुक्यातील ईळेगाव येथील ५५ वर्षीय बाबुराव शेळके या शेतकऱ्याचा मृत्यु झाला. तर, सोबत असणाऱ्या दोन महिला सुदैवाने बचावल्या आहेत. तसेच, सोनपेठ तालुक्यातील भाऊंचा तांडा येथील हरिबाई सुरनर यांचाही वीज पडून मृत्यू झालाय. सोबतच आणखी दोन वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून ६ जनावरे दगावली आहेत. दुसरीकडे भाजीपाल्यांचे ही नुकसान झाले आहे. पुर्णा तालुक्यातील चुडावा, दस्तापुर आदी ठिकाणी शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. माधव शिनगारे या शेतकऱ्याने टमाट्यामध्ये आंतरपीक दोडका घेतलं होतं, वेलवर्गीय पिकाला नुकतीच फळधारणा सुरू झाली होती. मात्र, अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने हा फड पूर्ण उध्वस्त झाला आहे.

### मराठवाड्यात कोणत्या जिल्ह्यात नुकसान

छत्रपती संभाजीनगर १६३ हेक्टरवरील पिकांचे नुकसान.
जालना १३४ हेक्टर पिकांचे नुकसान.
परभणी ५० हेक्टर पिकांचे नुकसान.
हिंगोली २९७ हेक्टर पिकांचे नुकसान.
नांदेडमध्ये ७४९ हेक्टर पिकांचे नुकसान.
बीडमध्ये सर्वाधिक १०२१ हेक्टर पिकांचे नुकसान
लातूरमध्ये ५० हेक्टर पेक्षा अधिक पिकांचे नुकसान
धाराशिव जिल्ह्यातही ३०८ हेक्टर पिकांना गारपिटीचा फटका बसला आहे.

## डाळींच्या किंमतीनं गाठली शंभरी, सर्वसामान्यांच्या खिशाला महागाईची झळ



सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराला सुरुवात केलीय. असा स्थितीत देशात कोणच्ही प्रकारची महागाई वाढू नये म्हणून केंद्र सरकार प्रयत्न करताना दिसत आहे. सध्या डाळींच्या किंमतीत मोठी वाढ होताना दिसतेय. डाळिंच्या किंमतीनं शतक गाठलं आहे. अशा स्थितीत किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारनं मोठं पाऊल उचललं आहे. डाळींच्या वाढत्या किंमती रोखण्यासाठी सरकारनं हस्तक्षेप केला आहे. व्यापाऱ्यांनी विविध डाळींचा साठा केला आहे हा साठा सात्पाहिक आधारावर जाहीर करावा अशा सूचना केंद्र सरकारनं विविध राज्यांना दिल्या आहेत. केंद्र सरकार डाळींच्या साठ्यावर लक्ष ठेवून आहे. तसेच आयात केलेल्या डाळींच्या साठ्यावरही सरकार लक्ष ठेवून आहे.

तुरीची डाळ १६० रुपये किलोवर

सध्याचा विचार केला तर तुरीच्या डाळीत मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. गेल्या काही दिवसापासून सातत्यानं दरात वाढ होत आहे. तुरीची डाळ सध्या १६० रुपये किलोवर गेली आहे. तसेच मूग आणि मसूर डाळींच्या किंमतीच्या बाबतीत देखील अशीच स्थिती आहे. त्यामुळं सर्वसामान्यांचया खिशाला मोठी कात्री लागत आहे. अशा स्थितीत डाळींच्या किंमती कमी करण्याचा सरकारकडून प्रयत्न केला जात आहे.

महागाई रोखण्यासाठी सरकारची विविध पावले

लोकसभा निवडणुकीत मतदारांचा कोणत्याही प्रकारचा रोष येऊ नये म्हणून सरकार महागाई रोखण्याचा प्रयत्न करत आहे. महागाई कमी करण्यासाठी सरकार विविध धोरणं आखत आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर कांद्याच्या निर्यातीवर सरकारनं घातलेली बंदी. देशात कांद्याच्या दरात वाढ होत होती. अशा काळात दर नियंत्रीत ठेवण्यासाठी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. यानंतर कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. एका बाजूला दर कमी झाले तर दुसऱ्या बाजूला मात्र, शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. ४००० रुपयावर गेलेले कांद्याचे दर हे सध्या ८०० ते १२०० रुपयांवर गेले आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागतोय. तसेच गहू आणि तांदळाच्या बाबतीत देखील सरकार किंमती वाढू नये म्हणून पावलं उचलली आहेत. गहू आणि तांदळाचा साठा जाहीर करणं व्यापाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं आहे.

## अखेर लासलगाव बाजार समितीत कांदा लिलाव सुरु, सरासरी मिळतोय इतका भाव

लासलगाव : लेव्हीप्रश्नी व्यापारी व माथाडी मंडळ यांच्यातील सुरू असलेल्या वादामुळे मागील आठ दिवसांपासून कांद्याचे लिलाव ठप्प झालेले होते. आज अखेर लासलगाव बाजार समितीत लिलाव सुरू झाले. स्थानिक बाजार समितीतील व्यापारी यांनी लिलावात सहभाग घेतला नाही मात्र नवीन परवानेधारक व विंचूर उपबाजार समितीतील व्यापारी यांनी लिलावात सहभाग घेत कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरू केले.लासलगाव बाजार समितीत गेल्या आठवडाभरापासून हमाली मापारी प्रश्नी लिलाव प्रक्रिया बंद होती. लेव्हीप्रश्नी व्यापारी व माथाडी मंडळ यांच्यातील सुरू असलेल्या वादामुळे कांद्याचे लिलाव ठप्प झालेले होते. आज अखेर लासलगाव बाजार समितीचे लिलाव सुरू झाले.



उन्हाळ कांद्याला मिळाला 'इतका' भाव : मात्र या लिलावात स्थानिक बाजार समितीतील व्यापारी यांनी सहभाग घेतला नाही. मात्र नवीन परवानेधारक व विंचूर उपबाजार समितीतील व्यापारी यांनी लिलावात सहभाग घेत कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरू केले. उन्हाळ कांद्याला सरासरी १ हजार ५०० रुपये भाव आज बाजार समितीत मिळाला. तर जास्तीत जास्त २९०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला.

शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान

दरम्यान, लेव्ही प्रश्नांवरून माथाडी मंडळ व व्यापारी यांच्यात सुरू असलेल्या वादामुळे नाशिक जिल्ह्यातील लासलगावसह १५ बाजार समित्यांमधील कांद्यासह शेतमाल लिलाव प्रक्रिया मागील आठ दिवसांपासून बंद आहे. या वादामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, माथाडी मंडळ व व्यापारी यांच्यात लेव्ही प्रश्नांसंदर्भात दोन ते तीन बैठका झाल्या मात्र व्यापारी व माथाडी मंडळ आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने तोडगा निघाला नाही. परिणामी बाजार समित्या बंदच होत्या. जिल्हा निबंधकांनी व्यापारी लिलावात सहभागी होत नसतील तर त्यांचे परवाने रद्द करा, बाजार समित्यांनी व्यापाऱ्यांनी दिलेल्या सुविधा बंद करा असे आदेश काल लासलगाव येथील संचालक मंडळाच्या बैठकीत दिल्याने लासलगाव बाजार समितीत कांदा लिलाव आजपासून सुरू करण्यात आले आहे.

## सेंद्रिय शेतीसाठी जीवामृत कसे तयार करावे?

सर्व प्रथम, गोमूत्र एका डब्यात ठेवा आणि त्यात ५ किलो शेण घाला. गाईचे शेण लघवीत मिसळावे आणि कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. यानंतर दुसऱ्या भांड्यात ३ किलो गूळ पाण्यात विरघळवून घ्या. (तयार मिश्रणात असलेले बॅक्टेरिया अधिक सक्रिय व्हावेत म्हणून गुळाचा वापर केला जातो) गूळ अशा प्रकारे मिसळा की कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही.

शेतमालाचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे, मात्र शेतकऱ्यांचे उत्पन्न नाही. शेतकरी बांधवांनो, शेतीत नफा मिळविण्याचे दोनच मार्ग आहेत, एक म्हणजे खर्च कमी करणे आणि दुसरे म्हणजे आपले पीक विकून जास्त भाव मिळवणे. भाव देणे हे शेतकऱ्याच्या हातात नसून त्याचा खर्च कमी करणे हे शेतकऱ्याच्या हातात आहे, त्यासाठी शेतकऱ्याला सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करावी लागेल. म्हणूनच किसान समाधान तुमच्या सर्वांसाठी सेंद्रिय कीटकनाशक बनवण्याची पद्धत घेऊन आले आहे.



कृती : सर्व प्रथम, गोमूत्र एका डब्यात ठेवा आणि त्यात ५ किलो शेण घाला. गाईचे शेण लघवीत मिसळावे आणि कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. यानंतर दुसऱ्या भांड्यात ३ किलो गूळ पाण्यात विरघळवून घ्या. (तयार मिश्रणात असलेले बॅक्टेरिया अधिक सक्रिय व्हावेत म्हणून गुळाचा वापर केला जातो) गूळ अशा प्रकारे मिसळा की कोणत्याही प्रकारची गुठळी राहणार नाही. आता विरघळलेला गूळ शेण असलेल्या मूत्रात मिसळा. हे दोन्ही मिश्रण नीट ढवळून घ्यावे. आता शेवटी २ किलो बेसन घाला. काही वेळ मिश्रण ढवळत राहा. मिश्रण चांगले मिसळले की ते एका मोठ्या कंटेनरमध्ये स्थानांतरित करा. आणि काही वेळ काठी घेऊन चालत राहा. यानंतर त्यात समान प्रमाणात पाणी घाला. त्याचप्रमाणे, सर्व मिश्रण ७ दिवस सोडा, परंतु ते सात दिवस वेळोवेळी काठीने ढवळत राहा. सात दिवसांनी तुम्ही ते झाडांवर वापरू शकता. हे कीटकनाशक झाडांवरील बुरशी मारतात. अशा प्रकारे तुम्ही तुमच्या शेतीवरील खर्च कमी करू शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.
१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.
१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.
१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.
१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.
१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.
१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.
१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.
१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.
२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)
१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.
१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.
१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.
१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.
१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)
१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)
१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )
१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.
१९४२ : मार्गरिट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल
१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार
१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.
१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)
१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.
१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण
१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)
१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)
१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.
२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

## शेतकऱ्यांनो मेंढीपालन सुरू करुन लाखो रुपये कमवा

मालपुरा, जैसलमेरी, मंडिया, मारवाडी, बिकानेरी, मारिनो, कॉर्डिलेरा माबुटू, छोटा नागपुरी आणि शहाबाद या भारतातील मेंढ्यांच्या जातीचे उत्पन्न मिळवते. मेंढीपालनातून चांगले पैसे कमवायचे असतील तर त्यांच्या स्वच्छतेकडे आणि आरोग्याकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. जेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न येतो. हा कचरा शेतात खत म्हणून वापरला जातो. भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील बहुतांश लोक शेती व संबंधित कामांवर अवलंबून आहेत. देशातील अनेक भागात विविध प्रजातींचे प्राणी पाळले जातात. ज्यामध्ये गाय, म्हशीपासून शेळी, उंट यांचा समावेश होतो. दुग्धव्यवसायासाठी या प्राण्यांचे संगोपन केले जाते. पण असाही एक प्राणी आहे जो दुधासाठी नाही तर लोकर मिळवण्यासाठी पाळला जातो.

देशातील अनेक भागात मेंढ्या पाळल्या जातात त्यामुळे एक पंत दोन पंत होतात. मेंढीपालनातून दूध तसेच लोकर मिळते.भारतातील बहुतांश भागात मेंढीपालन केले जाते. जेव्हा तुम्ही मेंढीपालन सुरू करता तेव्हा तुम्ही मेंढ्यांच्या सुधारित प्रजाती निवडाव्यात, जेणेकरून तुम्हाला अधिक दूध आणि लोकर मिळू शकेल. मालपुरा, जैसलमेरी, मंडिया, मारवाडी, बिकानेरी, मारिनो, कॉर्डिलेरा माबुटू, छोटा नागपुरी आणि शहाबाद या भारतातील मेंढ्यांच्या जातीचे उत्पन्न मिळवते. मेंढीपालनातून चांगले पैसे कमवायचे असतील तर त्यांच्या स्वच्छतेकडे आणि आरोग्याकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. जेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न येतो. हा कचरा शेतात खत म्हणून वापरला जातो. कळपातील मेंढ्यांना चरायला व बाहेरगावी नेले पाहिजे. मेंढ्यांचे आयुष्य साधारणतः ७ ते ८ वर्षे असते, परंतु ते शेतकरी आणि पशुपालकांसाठी पैसे कमवण्यासाठी पुरेशी लोकर तयार करतात. १५ ते २० मेंढ्यांचे पशुपालन करायचे असेल तर जातीनुसार एका मेंढीची किंमत तीन हजार ते आठ हजार रुपयांपर्यंत असू शकते. २० मेंढ्या खरेदी करण्यासाठी सुमारे १ लाख ते १.५ लाख रुपये खर्च येतो. २० मेंढ्यांसाठी ५०० स्क्वेअर फूट स्टॅबल पुरेसे असेल, जे ३०,००० ते ४०,००० रुपये खर्चून बांधले जाऊ शकते. यामुळे याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल.



## थोडक्यात

### शिवसंग्रामने भूमिका जाहीर करावी-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी



महाविजय २०२४ लोकसभा निवडणुक राज्यात भाजपा - महायुती एकत्रितपणे निवडणूक लढवत आहे. भाजपा- शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, मनसे, रासप, आरपीआय कवाडे गट, शिवसंग्राम आदि घटक पक्षांचा या महायुतीमध्ये समावेश आहे. यानुसार भारतीय जनता पार्टी प्रदेश अध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शना नुसार स्व. विनायकराव मेटे साहेब यांचा फोटो आणि शिवसंग्राम चा उल्लेख सन्मान पूर्वक वापरला गेला आहे. महायुती व घटक पक्षाची पहिली जाहीर बैठक आशीर्वाद लॉन्स बीड येथे संपन्न झाली. या बैठकीस शिवसंग्रामचे प्रदेश अध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी स्वतः उपस्थित राहून, महायुती समर्थनार्थ सुतोवाच केले होते. या भूमिकेच्या अनुषंगाने भाजपा प्रदेश अध्यक्ष व जेष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शना नुसार शिवसंग्राम व स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांचा फोटो महायुती धर्म पाळून सन्मानपूर्वक वापरला जात आहे. याबाबत आज शिवसंग्राम तर्फे घेतलेला आक्षेप चुकीचा असून नाव आणि फोटो वापरण्या मागे कोणताही खोडसाळपणा अथवा संभ्रम निर्माण करण्याचा हेतू नाही. शिवसंग्रामची ही भूमिका स्पष्ट असेल तर, त्याचाही विचार महायुतीचे जेष्ठ नेते जरूर करतील. निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी शिवसंग्रामे आपली भूमिका स्पष्टपणे प्रस्तुत करावी. परंतु धादांत आरोप करून नये असे आग्रहाचे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने राजेंद्र मस्के यांनी केले आहे. तूर्तास भाजपा यापुढे फोटो आणि नाव वापरणार नाही.

### सार्वजनिक जयंती उत्सवात सहभागी व्हा-महादेव बनसोडे

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील गावागावात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीराव फुले यांच्या सार्वजनिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले असून, १४ एप्रिल रोजी साजरी होणाऱ्या जयंती उत्सवात सहभागी होऊन, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शिका आणि संघटीत व्हा, या विचाराचा जयंती उत्सव साजरा करा, असे आवाहन रिपाईचे ज्येष्ठ नेते महादेव बनसोडे यांनी येथे बोलताना केले आहे. गेवराई तालुक्यातील विविध भागात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. गेवराई तालुक्यातील उमापूर येथे आयोजित १४ एप्रिल रोजी ध्वजारोहण करण्यात येऊन, सार्वजनिक जयंती उत्सव साजरा करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचीभव्य मिरवणूक काढण्यात येते.या वर्षीचा जयंती उत्सव भीमज्योती जन्मोत्सव म्हणून साजरा केला जात असून, शिका संघटीत व्हा, असा जाज्वल्य अभिमान जागवणारा मंत्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला आहे. या विचाराचा जागर करून, बहुजन समाजातील घटकांनी बाबासाहेबांचा हा विचार, सार्वजनिक जयंती उत्सवाच्या माध्यमातून अंमलात आणावा, असे प्रतिपादन रिपाईचे ज्येष्ठ नेते महादेव बनसोडे यांनी केले असून, गेवराई तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन ही रिपाईचे नेते महादेव बनसोडे यांनी केले आहे.

### अवकाळीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्या : ॲड.बेदरे

गेवराई । प्रतिनिधी



जिल्ह्यात अचानक झालेल्या अवकाळी पाऊस व गारपट्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले असून पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकार केले आहे. शेतकऱ्यांच्या शेतात उभे, टरबूज, आबा,खरबूज, डाळींब, यासह मिरची, टोमॅटो, भाजीपाला आदी उन्हाळी पिकाचे अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे आधीच शेतकरी दुष्काळाचा सामना करत असताना शासन व प्रशासन दुष्काळी उपयोजना करण्यात कमी पडल्याचे दिसून येते अशा परिस्थितीत अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, या नुकसानाचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शासनाकडे शेतकऱ्याच्या नुकसानीचा अहवाल प्रशासनकडे पाठवाव व शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### मोफत रांगोळी,एचडी मेकअप प्रशिक्षण -जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमीत्त स्त्री- शक्ती प्रतिष्ठान बीडच्या वतीने महीला आणि विद्यार्थ्यीनीसाठी संभाजी नगर पोलीस पेट्रोल पंपाजवळ नगर रोड बीड येथे मोफत दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या सामुहिक वाचनाने होणार असुन प्रथम सत्रात दि. १५ एप्रिल रोजी सुप्रसिद्ध रांगोळी आर्टिस्ट अंजली खोबरे या रांगोळी आर्टचे प्रशिक्षण तर दि. १६ एप्रिल रोजी सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट कोमल या एचडी मेकअपचे प्रशिक्षण देणार आहेत. सकाळी ११ ते ५ यावेळेत चालणाऱ्या या कार्यशाळेचा समारोप डॉ. वृषाली नागरे यांच्या किशोरवयीन मुली आणि माता यांच्या साठी आयोजित गुड टच बॅड टच आणि मासिक पाळीतील समस्या या विषयावरील व्याख्यानाने होणार आहे. तरी बीड शहरातील जास्तीत जास्त महीला आणि मुलींनी ९८२३७४४४५५, ८२३७१ ७९४०४, ९१५०५ ७८६७८, ९१५६० ३६४६३ या मोबाईल नंबर वर नोंदणी करुन दोन चालणाऱ्या उपक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन स्त्री शक्ती प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा तथा नगरसेविका सौ जयश्री विलास विधाते यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्याने अध्यात्मिक वैभव टिकविले आहे - जयदत्त क्षीरसागर

शिरूर । प्रतिनिधी

वाणी आणि विणा यांच्यात समानतेचा धागा कसा असतो हे वारकरी सांप्रदायामुळे कळाले. अध्यात्मिक श्रीमंती जिल्ह्याची आहे. अध्यात्मिक वैभव बीड जिल्ह्याने टिकविले आहे असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. शिरूर कासार तालुक्यातील मार्कडवाडी येथे ह.भ.प. वै.गुरूवर्य स्वामी निगमानंद महाराज श्री क्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड यांच्या कृपाशिर्वादाने दि.०५ एप्रिल रोजी सुरू झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शुक्रवारी ह.भ.प. महंत स्वामी जनार्दन महाराज श्री क्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली.



यावेळी भाविक भक्तांशी संवाद साधताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत वामनभाऊंची मुर्ती बसविल्यापासून गेल्या ११ वर्षापासून मार्कडवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. आज कलशारोहण झाले आहे. सन १९८७ साली गुरूवर्य स्वामी निगमानंद महाराज मच्छिंद्र गडावर आले त्यावेळी अंधश्रध्दा होती. त्यांनी अंधश्रध्दा निर्मुलन केले गडाची सेवा केली. मच्छिंद्रनाथगड हे अध्यात्मिक वैभव आहे ते जोपासणे तुमची आमची जबाबदारी आहे. संत सर्व समाजाला बरोबर घेऊन चालतात. संत महात्मे जात, धर्म पाळत नाहीत मच्छिंद्रनाथगड हे निगमानंद महाराजांचे संस्थान आहे. गहिनीनाथगडाचा नारळी सप्ताह तांदळवाडी (भिल्ल), श्री क्षेत्र नारायणगडाचा नारळी सप्ताह सिरसमार्ग येथे आहे. चैत्र महिन्यात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह असतात. फुलसांगवी, मार्कडवाडी या गावांसह परिसरातील गावांना रस्त्याने जोडलेआहे. या वर्षी पाण्याची टंचाई भासत असून फुलसांगवीचा तलाव पाच-दहा वर्षातून एकदा भरतो या भागात दुष्काळी परिस्थिती जाणवत आहे. येत्या दोन महिन्यात बुडीत क्षेत्रात विहीरी घेण्याचे काम सुरू होणार आहे. ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव सादर करावेत. या भागातील दळण-वळण वाढावे म्हणून रस्त्याची जोडणी केलेली आहे. बीड जिल्ह्यातील देवस्थानासाठी मागील काळात निधी उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ह.भ.प. उध्दव महारज शास्त्री नारायणवाडी, अरूण डाके, सतीश काटे, सुधाकर मिसाळ, विजय सरवदे, प्रा.विष्णू सोनवणे, प्रकाश इंगळे, सुभाष क्षीरसागर, महादेव महाराज घुंगरड, सिध्देश्वर आर्सुळ, अर्जुन नरवडे, सोनाजी क्षीरसागर, रमेश तळेकर, भिमराव सानप, हौसराव जायभाये, भास्कर सानप, सखाराम तळेकर, शेख बिबन, अर्जुन खेडकर, दत्ता जायभाये यांच्यासह महिला, पुरूष, भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी उद्योग आघाडीच्या प्रदेश सरचिटणीसपदी संतोष जेथलिया

माजलगाव । प्रतिनिधी



राष्ट्रीय नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांच्या आदेशानुसार प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे व माजी मंत्री आ. प्रकाश सोंळके यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे संतोषबापु जेथलिया यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उघोग आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस पदावर नियुक्ती केल्याचे पत्र प्रदेश अध्यक्ष सुभाष मालपाणी यांनी दिले आहे.विद्यार्थी दशेपासुन ते आज पर्यंत पवार कुंटूंब यांच्या विचारांवर चालणार्या अभ्यासु, विचारवंत वक्ते असलेल्या,अष्टपैलू सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार , प्रसिद्ध व्यापारी संतोषबापु जेथलिया यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उघोग आघाडी प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती करून यांना माजी मंत्री आ.प्रकाश सोंळके यांनी न्याय दिला आहे.

आठरा पगड जाती जमाती,सर्व धार्मिय बांधव यांना बरोबर घेऊन चालणार्या दिशादर्शक अशा जेष्ठ कार्यकर्ते यांना न्याय मिळाल्याची भावना समाजाच्या सर्व थरातून व्यक्त होत आहे.या निवडीचे व्यापारी महासंघ माजलगाव.माहेश्वरी सभा बीड जिल्हा, तालुका पत्रकार संघ,माहेश्वरी माजलगाव तालुका सभा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, जाणीव गृप १९८९ यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत पुढील आयुष्यात सर्व धर्मीय समाज बांधव यांना बरोबर घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे विचार तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत असे विचार संतोषबापु जेथलिया यांनी व्यक्त केले

## डॉ.आंबेडकर जयंती निमित्त ब्रिटिशांच्या भूमीत पोटभरेंचे लँडिंग

### शिवराय,भिमरायाच्या प्रतिमा उंचावत स्वाभिमानाचा गाजवला डंका

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युनायटेड किंगडम येथील आंबेडकरी समुदायाच्या वतीने आयोजित भीम जयंती महोत्सवात बाबुराव पोटभरे हे विशेष निमंत्रित आहेत.त्यानिमित्त त्यांनी मायभूमितुन दि ११ एप्रिल गुरुवार रोजी लंडनकडे प्रयान केले.दरम्यान दि १३ एप्रिल शनिवार रोजी पहाटे ब्रिटिशांच्या भूमित त्यांचे लँडिंग झाले.यावेळी पोटभरेंनी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,व घटनाकार भिमरायाच्या प्रतिमा उंचावत देशाच्या स्वाभिमानाचा डंका गाजवला.

माणसाला माणसात आणणार्या, संपूर्ण मानवी समाजाला समतेची शिकवण देणाऱ्या महामानव, क्रांतीपुरुष




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभरात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत असते.त्यापैकी युनायटेड किंगडम येथे''फेडरेशन ऑफ आंबेडकराईट बुद्धिस्ट फेडरेशन (फॅबो)कांशी टीव्ही,वाल्मीकि, रविदाशी आंबेडकरी राईट इत्यादी आंबेडकर प्रेमी संघटनाद्वारा आयोजित डॉ.आंबेडकर जयंतीत मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. त्यानिमित्त त्यांचे १३ एप्रिल शनिवार रोजी ब्रिटिशांच्या भूमीत लँडिंग झाले आहे.दि १३ एप्रिल ते १६ एप्रिल दरम्यान येथील आयोजित कार्यक्रमात त्यांचा सहभाग असणार आहे.आत्यंतिक हर्षोल्हासाने हा उत्सव येथे या दरम्यान साजरा करण्यात येतो.

बुध्दधम्म,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले,छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह सर्व महामानवांची अमुल्य विचारधारा या संघटना आपल्या मुलांमध्ये रुजवत आहेत हे विशेष.व त्यानिमित्तच पोटभरे यांना या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित करण्यात आले आहे.

## केज शहरात साजरी झाली क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची जयंती

केज । प्रतिनिधी

शहरात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी हजारो फुले प्रेमी नागरिकांची उपस्थिती होती.

केज शहर जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील जयंती निमित्त शहरातील



श्री. संत सावता माळी मंदिरात रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. तसेच दिनांक ११ एप्रिल रोजी भव्य दिव्य रथामध्ये क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांचा पुतळा विराजमान करून शहरातील वकील वाडी येथील हनुमान मंदिरापासून सायंकाळी पाच वाजता मिरवणुकीला सुरुवात झाली. सदरील मिरवणुकीमध्ये परळी येथील हलगी पथक, नेवासा येथील संबळ पथक तसेच सोनी जवळा येथील बँजो पथकाने मिरवणुकीमध्ये उत्साह वाढवला होता. हनुमान मंदिरापासून निघालेली मिरवणूक कानडी रोड ये छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत आणि तिथून मुख्य रोड वरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत नेण्यात आली आणि त्या ठिकाणी मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले. सदरील मिरवणुकीमध्ये शहरातील हजारो फुले प्रेमी नागरिकांनी उपस्थिती दर्शवली आणि भर पावसातही अतिशय उत्साहात आणि जल्लोषात मिरवणूक संपन्न केली. दरम्यान जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जयंती उत्सव शांततेत आणि जल्लोषात पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी केज पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## भीमाशंकर नावंदे यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे परचुंडी येथील सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत असलेले सामाजिक कार्यकर्ते तथा प्रेस फोटोग्राफर भीमाशंकर नावंदे यांचा आज शनिवार दिनांक १३ एप्रिल रोजी वाढदिवस परचुंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून भीशंकर नावंदे यांनी समाज उपयोगी उपक्रम राबवत वाढदिवस साजरा केला. भीमाशंकर नावंदे हे राजकारण न करता नेहमीच समाजकारणामध्ये सक्रिय असल्याचे दिसून येते. परचुंडी व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी भीमाशंकर नावंदे हे नेहमीच सक्रिय असतात. युवकांना सोबत घेऊन काम करणे हे भीशंकर नावंदे यांचा नेहमी उद्देश असतो. श्री नावंदे हे नेहमीच हसतमुख सर्वांसोबत प्रेमाने वागणारे व्यक्तिमत्व म्हणून परचुंडी व पंचक्रोशीमध्ये ओळखले जाते.



वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परचुंडी ता.परळी वैजनाथ येथे अनावश्यक खर्च टाळून खर्या अर्थाने समाज उपयोगी उपक्रम राबवला, यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊवाटप करून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही मनोभावना मनात ठेवून खर्या अर्थाने भीमाशंकर नावंदे यांनी कार्य केले आहे. यावेळी जेष्ठ मंडळी सुभाष दादा रुपनर, व्यंकट पाटील गडदे, राम अण्णा सरांडे, कमलाकर नावंदे, अर्जुन सरांडे, बलभीम थोरात,बंडू सुरवसे, शंकर पत्रवाळे, दयानंद नावंदे, प्रेस फोटोग्राफर गणेश पत्रवाळे व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. दरम्यान आज सकाळपासूनच भीमाशंकर नावंदे यांना दुर्ध्वनी व सोशल मिडीडीयाच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, इंजिनिअर, वकील यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## सुशिक्षित नागरिकांनाच निवडणूक साक्षरतेची खरी गरज - प्रा. शरद पवार

पाटोदा । प्रतिनिधी

देशातील निरक्षर व अशिक्षित नागरिक निवडणूक प्रक्रियेत मतदान करण्यासाठी उत्साहाने सहभाग घेतात परंतु सुशिक्षित नागरिक मतदानाचा हक्क बजावण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात असे दिसून येते म्हणून सुशिक्षित नागरिकांना निवडणूक साक्षरतेची खरी गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. शरद पवार यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १३ एप्रिल रोजी आयोजित निवडणूक साक्षरता मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागांच्या संयुक्त विद्यमाने निवडणूक साक्षरता मंडळाचा उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अभय



क्षीरसागर होते. व्यासपीठावर पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. काकासाहेब पोकळे, लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. शरद पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रशांत पाटील यांनी निवडणूक साक्षरता मंडळाचे महत्व व कार्य स्पष्ट केले. दुसऱ्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. काकासाहेब पोकळे यांनी लोकशाही शासनव्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया व मतदान याचे महत्व विषद केले. स्वातंत्र्यप्राप्तीपासून आतापर्यन्त मतदानाचा टक्का सत्तर टक्क्यांपेक्षा पुढे सरकलेला नाही हे दुर्दैव आहे. म्हणून मतदार जागृती करून सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नवमतदारांची नोंदणी करण्याची मोहीम सुरु करण्याचा मनोदय व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत पाटील यांनी केले. आभार प्रा. मनिषा गाढवे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक बांगर ॲक्शन मोडवर: आता गुन्हेगारांची खैर नाही

गेवराई । प्रतिनिधी

अवैध वाळु चोरी,घरफोडी,गुंडगिरी,सह कायदा सुव्यवस्थेला बांधा पोहचविणा-या समाज कटक यांच्या विरुद्ध नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी रणशिंग फुकत खाकीचा पावर दाखवण्यास सुरुवात करताच गुन्हेगार तालुका सोडून पळु लागले असल्याचे चित्र एकदरित निर्माण होऊ लागले आहे.दरम्यान गेल्या काही दिवसात पोलिस निरीक्षक बांगर हे एक्शन मोडवर येत, दिवसा ढवळ्या सोनाराला लुटणारी टोळी,अवैध वाळु वाहतुक करणारे माफिया ,शहरात असंतोष निर्माण करणारे टोळक्या सह अवैध दारु,मटका,पत्त्याचे कल्ब वर कारवाई करुन तब्बल ९२ गुन्हेगारांना लोकसभा निवडणुकीसाठी प्रतिबंधात्मक कारवाई करुन पोलिसांचे धाक गुन्हेगारात निर्माण करत शहरातील शांतता अबाधित ठेवली आहे. तसेच शहरासह पोलिस ठाण्याचे हद्दीत कुठेही अनुचित प्रकारसह कोणी दहशत निर्माण करत असल्यास थेट माझ्याशी सपर्क करा आम्ही गुन्हेगारी मोडून काढू असे आवाहन देखील पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी केले आहे.



जानेवारी महिण्यात नव्याने गेवराई पोलिस ठाण्यात रजु झालेले पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी अवद्या दोन महिण्यात कधी न झालेल्या कारवाई करुन आपण गुन्हेगारांना भीक घालत नसल्याचे विविध कारवाईतून दाखवून दिले आहे. त्यांना येथील उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरु यांचे विशेष मार्गदर्शनाखाली बांगर यांनी कारवाईचा धडाका लावला आहे. गेल्या दोन महिण्यात २४ ठिकाणी बेकायदा दारु विक्री करणाऱ्यांवर कारवाई करुन गुन्हे दाखल करत लाखोचा मुद्देमाल जप्त केला, तसेच गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळु वाहतुक करणारे वाळु माफियांना सळो की पळो करुन सोडत ६ वाहनावर कारवाई करुन अवैध वाळु वाहतुकीला आळा घातला.पोलिस ठाण्याचे हद्दीत विविध ठिकाणी टोळक्या टोळक्या ने जुगाराचे डाव टाकून बसलेल्या जुगा-या विरुद्ध २० ठिकाणी दबंग कारवाई करत घडकी भरवली, शहरासह ग्रामीण भागात घरफोडी करुन पसार होणा-या चोरट्यांचे मुसक्या आवळत मालमत्तेचे पाच पैकी ४ गुन्हे ओपन करुन चोरट्यांना जेल ची हवा खाऊ घातली ,दिवसा ढवळ्या सोनारास लुटणारे टोळीचा पर्दाफाश करुन बेड्या ठोकले,तसेच शहरातील गुंडगिरी मोडून काढत मराठा आंदोलनासह विविध ठिकाणी चोक पोलिस बंदोबस्त ठेवून, विशेष मोहिम राबवत मोटर वाहन कायदाखाली कारवाई करुन ४४४०० रुपयाचे दंड आकारुन कायदाचे पालन करण्याचे धडे दिले आहे.तसेच लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ९२ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली तर सर्वच क्षेत्रातील विविध ठिकाणी डैशिंग कारवाई होऊ लागल्याने गुन्हेगार मध्ये पोलिसांची दहशत निर्माण होऊन लागली तर नागरिकां मध्ये देखील पोलीस कारवाईमुळे समाधान मानले जात आहे.तर गुन्हेगारी ला देखील आळा बसू लागल्याने गुन्हेगारी मोडून निघत आहे. दरम्यान दोन वर्षाच्या काळात गेवराई पोलिस ठाण्याला खमक्या अधिकारी मिळाला नसल्याने गुन्हेगारी फोफावली होती.परंतु आता पोलिस निरीक्षक बांगर यांनी गुन्हेगारा विरुद्ध जोरदार मोहिम राबवली असल्याने कायदा सुव्यवस्था बिघडवणारे यांचे सळो की पळो झाली असून कोणी शांततेला बांधा आणत असेल तर त्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे सागत कुठेही अनुचित प्रकार सह कोणी दहशत निर्माण करत असल्यास थेट माझ्याशी सपर्क करा आम्ही त्याचा बंदोबस्त करु असे अवाहन पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी केले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ | ६



# कंगना विरुद्ध काँग्रेसचा उमेदवार ठरला!

**नवी दिल्ली | वृत्तसेवा**

बॉलीवूड अभिनेत्री कंगना रानौत या हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्याविरोधात काँग्रेसचे हिमाचल प्रदेशमधील मंत्री विक्रमादित्य सिंह निवडणूक लढवतील, अशी माहिती मंडीच्या काँग्रेसच्या विद्यमान खासदार प्रतिभा सिंह आणि विक्रमादित्य यांच्या आई प्रतिभा सिंह यांनी दिली आहे. पक्षाकडून अद्याप विक्रमादित्य यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र, भाजपने कंगना राणौत मंडीतून उमेदवार घोषित केले आहे. त्या काय करतात किंवा काय बोलतात यामुळे आम्हाला काही फरक पडत नाही. मंडईतील जनता सदैव आमच्यासोबत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.



## विक्रमादित्य सिंह देणार टक्कर

मला कोणीही धमकावू शकत नाही. हा मतदारसंघ काहींना आपल्या पूर्वजांची इस्टेट वाटते, अशा शब्दांमध्ये कंगना राणौत यांनी टीका केली होती. प्रतिभा सिंह म्हणाल्या की, कंगना राणौत यांनी विक्रमादित्य विरोधात केलेल्या टीकेची मला पर्वा नाही. यापूर्वी कठीण परिस्थितीतही मी जागा जिंकली आहे. कंगना यांनी गोमांस खाल्ल्याबद्दलच्या वृत्तांबद्दल बोलताना विक्रमादित्य सिंह म्हणाले होते की, ''मी प्रभू रामाला प्रार्थना करतो त्यांना बुद्धी द्यावी. 'देवभूमी' हिमाचलमधून बॉलीवूडमध्ये परत जाईल. कारण ती निवडणूक जिंकणार नाही कारण तिला हिमाचलच्या लोकांबद्दल काहीच माहिती नाही. त्यांनी हिमाचल प्रदेश आणि मंडीतील प्रश्नांवर बोलावे. मान्सूनच्या सर्वात भीषण आपत्तीत कंगना यांनी एका दिवसासाठीही मनालीला भेट दिली होती का, असा सवालही त्यांनी केला होता.

### कोण आहेत विक्रमादित्य सिंह?

विक्रमादित्य हे हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वीरभद्र सिंह यांचे पुत्र आहेत. त्यांचा जन्म १७ जन्म १७ ऑक्टोबर १९८९ रोजी झाला. २०१६ साली सेंट स्टीफन कॉलेज दिल्ली येथून मास्टर्स ऑफ आर्ट्स (इतिहास) मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. त्यांनी हंस राज कॉलेज दिल्ली विद्यापीठातून २०११ मध्ये बीए (ऑनर्स) केले आहे. व्यवसायाने, ते एक कृषीतज्ज्ञ, बागायतदार आणि व्यापारी आहेत. हिमाचल प्रदेशात ते दोनदा आमदार झाले. २०२२ मध्ये विक्रमादित्य सिंह यांनी भारतीय जनता पक्षाच्या रवी मेहता यांचा १३८६० मतांच्या फरकाने पराभव करून सिमला ग्रामीण विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला. याव्यतिरिक्त, त्यांनी २०१३ ते २०१८ पर्यंत हिमाचल प्रदेश राज्य युवक काँग्रेसचे प्रमुख म्हणून काम केले आहे.

# मोदी पुन्हा सत्तेत आल्यास राजासारखे वागतील; नाना पटोले यांचा गंभीर इशारा

**भंडारा | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपाचे उमेदवार मोदींच्या नावाने मताचा जोगवा मागत आहेत. मोदींना मतदान का करायचे? मोदींनी महागाई वाढवली, बेरोजगारी वाढवली, शेतकरी उद्ध्वस्त केला, गरिबी वाढवली, आपले जवान सीमेवर दररोज शहिद होत आहेत म्हणून मतदान करायचे का? असा सवाल विचारात मोदींना मतदान मागण्याचा काही अधिकार नाही. मोदी पुन्हा सत्तेत आल्यास 'वन नेशन, नो इलेक्शन' करुन राजासारखे वागतील आणि जनतेला गुलाम बनवतील, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचारासाठी भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील ब्रम्ही, सावरला, भुयार, वलनी, मांगली, आसगाव, कोंडा, चिंचाळ गावांना भेटी दिल्या व जनतेशी संवाद साधला. यावेळी नाना पटोले म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी सत्तेत येण्याआधी भरघोस आश्वासने दिली होती, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देणार, शेतीचे उत्पन्न दुप्पट करणार, महागाई कमी करणार परंतु यातील एकही आश्वासन पूर्ण



केले नाही. मोदींनी नोकऱ्या तर दिल्या नाहीतच पण ज्या नोकऱ्या होत्या त्याही गमवाव्या लागल्या. राज्यातील तरुण शिक्षित मुले विविध स्पर्धा परीक्षा देतात पण पेपर फुटण्याचे प्रमाण वाढल्याने त्यांचे स्वप्न भंग होत आहे. नरेंद्र मोदी पुन्हा सत्तेत आले तर ते वन नेशन, नो इलेक्शन करुन राजासारखे वागतील व जनतेला गुलामासारखे वागवतील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधानही संपवू असे भाजपचे नेते रोज म्हणत आहेत. लोकसभेची यावेळची निवडणूक ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई आहे. स्वातंत्र्य, लोकशाही व संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असून मोदींच्या तानाशाही सरकारला सत्तेतून पायउतार करा आणि काँग्रेस, इंडिया आघाडीला विजयी करा, असे आवाहन नाना पटोले यांनी केले.

# विकासनिधी वापस जाऊ देणाऱ्यांना मते मागण्याचा अधिकार नाही –बजरंग सोनवणे

**पाटोदा | प्रतिनिधी**

मते मागायलाही ज्या आल्या नाहीत ज्यांनी विकासासाठी आलेला निधी देखील खर्च केला नाही . तो सर्वसामान्यांच्या हक्काचा निधी नाकर्तेपणामुळे वापस गेला याला कारणीभूत असणाऱ्यांना आता आपल्या बहिणीसाठी देखील मते मागण्याचा नैतिक अधिकार नसल्याचा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तथा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केला

पाटोदा तालुक्यातील गावांमध्ये गावभेट व मतदारांशी संवादा दरम्यान घुमरे पारगाव येथे ते बोलत होते . यावेळी त्यांच्या सोबत माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, किशोर नाना हंबर्डे, पूजाताई मोरे, अ‍ॅड. जाधव, मुकुंद शिंदे, आष्टी विधानसभा प्रमुख रामभाऊ खाडे,



परमेश्वर शेळके, आपचे डॉ महेश नाथ, अशोक येडे, उद्धव दरेकर, काँग्रेसचे रविदादा ढोबळे, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, सचिन वारूळे, ऋषी दरेकर,डॉ चौधरी, सचिन अरुण, विष्णू घोलप, बालासाहेब मिसाळ हे होते.

पुढे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले कि ; ज्यांनी महाविकास आघाडीचे सरकार असताना शेतीमालाला भाव मिळावा म्हणून मोर्चे काढले आंदोलने केली त्यांना मात्र केंद्रात आणि राज्यात सरकार येताच विसर पडला देशात पेट्रोल डिझेल गॅस याचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत महागाई प्रचंड वाढलेली आहे खते, बी बियाण्यांचे भाव प्रचंड वाढलेले आहेत. मात्र सोयाबीन, कापूस कांदा यांचे भाव पडलेले असून मातीमोल भावाने त्याची विक्री करावी लागत आहेत. याचाही जाब भाजप उमेदवारांना आणि त्यांच्या समर्थकांना विचारायला हवा. असे परखड मत बजरंग सोनवणे यांनी पाटोदा तालुक्यातील गावांना दिलेल्या भेटी दरम्यान व्यक्त केले

पाटोदा तालुक्यातील वाघिरा फाटा, वाघीरा आणि वैद्यकिन्ही, वैजाळा पाचेगाव, पाचंग्री, मंझरी, अनपटवाडी, ढाळेवाडी, पाटोदा आणि धनगर जवळका, पारनेर, गवळ वाडी, कुसळंब, सुपा, सावरगाव घाट, मुगगाव याठिकाणी भेटी देवून त्यांच्याशी संवाद साधला.

# तिहारमध्ये केजरीवालांना पत्नीसोबत चर्चा करु दिली नाही

**नवी दिल्ली | वृत्तसेवा**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना तिहार तुरुंग प्रशासन अमानवी वागणूक देत असल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी केला. त्यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेत सुनीता केजरीवाल यांना तिहार तुरुंगात अरविंद केजरीवाल यांच्याशी समोरासमोर भेटण्याची परवानगी नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांना खिडकीतून केजरीवाल यांना भेटू दिले. तिहार जेल प्रशासन भाजपच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तिहार तुरुंगात आमने-सामने भेटणे सामान्य बाब आहे. अरविंद केजरीवाल यांना अमानुष वागणूक दिली जात आहे. भ्याड गुन्हेगारांनाही त्यांच्या कुटुंबियांना भेटण्याची परवानगी आहे. तर दिल्लीचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या केजरीवाल यांच्या पत्नीला आणि पीएला खिडकीतून भेटायला लावले जात आहे असे अमानुष वर्तन का? असा सवाल संजय सिंह यांनी केला. हे कृत्य केवळ मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अपमानित करण्यासाठी आणि निराश करण्यासाठी केले जात आहे. आजचा लढा लोकशाही आणि संविधान वाचवण्याचा असल्याचेही ते म्हणाले.



### भेट रद्द केल्याचा आरोप

**पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि दिल्लीचे खासदार अरविंद केजरीवाल यांची भेट तिहार तुरुंग प्रशासनाने शेवटच्या क्षणी रद्द केल्याचा आरोप आप नेत्याने केला. यामागे सुरक्षेचे कारण सांगण्यात आले. आम्हाला सांगण्यात आले आहे की पंजाबचे मुख्यमंत्री आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना खिडकीच्या चौकटीतून भेटावे लागेल. तुम्ही दिल्लीचे मुख्यमंत्री, पंजाबचे मुख्यमंत्री यांचा अपमान करत आहात, अरिंवद केजरीवाल यांना तोडण्याचा प्रयत्न करत आहात. माझी दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांसोबतची बैठक रद्द करण्यात आली आहे असेही ते म्हणाले.**

# काँग्रेस आमदारांना ५० कोटींची ऑफर

**बंगळुरू | वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मोठा दावा केला आहे. भाजपा राज्यात ऑपरेशन लोटस सक्रिय करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपाने काँग्रेस आमदारांना पक्ष बदलण्यासाठी ५० कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप सिद्धरामय्या यांनी केला.

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी संवाद साधला. यावेळी कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला तर सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारही पडेल, असा आरोप भाजपाकडून करण्यात येत आहे. याबाबत सिद्धरामय्या यांना विचारण्यात आले असता ते म्हणाले, गेल्या एक वर्षापासून ते (भाजपा) आमचे सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी आमच्या आमदारांना ५० कोटींची ऑफरही दिली होती. त्यांनी प्रयत्न केले पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. सिद्धरामय्या पुढे म्हणाले हे शक्य नाही. आमचे आमदार आम्हाला सोडणार नाहीत. एकही आमदार पक्ष सोडणार नाही. दरम्यान, सिद्धरामय्या यांनी आपल्या नेतृत्वाखाली काँग्रेस पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करेल, असा विश्वास



व्यक्त केला आहे. दुसरीकडे, सिद्धरामय्या यांच्या आरोपांना उत्तर देताना भाजपा खासदार एस प्रकाश म्हणाले की, समाजातील एका वर्गाची सहानुभूती मिळवण्यासाठी ते वारंवार असे आरोप करत आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आहे. याचबरोबर, कर्नाटकातील सिद्धरामय्या यांच्या काँग्रेस नेतृत्वाखालील सरकारचे प्रमुख मुद्दे आणि उपलब्धी यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी मुख्यमंत्री खोटे आरोप करत आहेत. तसेच, लोकसभा निवडणुकीत कर्नाटकात २८ जागा जिंकण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, सिद्धरामय्या केवळ निवडणुकीनंतर आपला पाय रोवण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत, असेही भाजपा खासदार एस.प्रकाश म्हणाले.

# फडणवीसांनी राणेंना रस्त्यावर आणले–नाईक



**मुंबई | प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस मागे लागले होते, म्हणून मी भारतीय जनता पक्षात आलो, असं विधान केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलताना केलं होतं. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी राणेंवर शाब्दिक प्रहार केला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार राहणार नाही. मते न मिळाल्यास विकासनिधी देणार नाही. सरपंचांना अशी धमकी देणे, ही नितेश राणेंची जुनीच परंपरा आहे. नारायण राणेंना देवेंद्र फडवणीस हे रस्त्यात भेटत होते. त्यावेळी त्यांनी राणेंना भाजपात प्रवेश करण्यास सांगितलं. त्याच फडणवीसांनी आता राणेंना रस्त्यावर आणलं आहे. असं म्हणत ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी राणेंवर निशाणा साधला आहे.

# भाजपाचे संकल्प पत्र आज होणार प्रसिद्ध

**नवी दिल्ली | वृत्तसेवा**

देशात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राजकीय पक्षांच्या प्रचार सभांना वेग आला आहे. तसेच, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जाहीरनामे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. दरम्यान, भाजपाचा जाहीरनामा १४ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा आपल्या दिल्लीतील मुख्यालयात जाहीरनामा प्रसिद्ध करणार आहे. यावेळी भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. भाजपाने आपल्या जाहीरनाम्याला संकल्प पत्र असे नाव दिले आहे.

यंदा भाजपाच्या संकल्प पत्रात कोणती आश्वासने दिली जातात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आधीच निवडणूक आश्वासने देणाऱ्या पक्षाच्या जाहीरनाम्यावर विरोधी पक्षही लक्ष ठेवून आहेत. भाजपाने जाहीरनामा तयार करण्यासाठी २७ सदस्यीय समिती स्थापन केली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करत होती. भाजपाने संकल्प पत्राबाबत लोकांकडून सूचनाही मागविण्यात आल्या होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, दीड लाखांहून अधिक लोकांनी व्हीडीओच्या माध्यमातून पक्षाला आपल्या सूचना दिल्या आहेत. नमो ॲपच्या माध्यमातून ४० हजारांहून अधिक सूचनाही मिळाल्या आहेत. संकल्प पत्राशी संबंधित एकूण ५ लाख सूचना पक्षाकडे आल्याचे सांगण्यात आले.

संकल्प पत्र तयार करण्यासाठी बैठकांच्या अनेक फेऱ्या झाल्या असून त्यात आगामी निवडणुकीत जनतेला कोणत्या गोष्टींचे आश्वासन द्यायचे आहे, हे ठरविण्यात आले. तसेच, भाजपाच्या संकल्प पत्राची थीम 'मोदींची गॅरंटी: विकसित भारत २०४७' असू शकते. याशिवाय, यामध्ये देशाला विकसित बनवण्यासाठी अनेक घोषणा केल्या जातील. महिला आणि गरीबांवरही लक्ष केंद्रित केले जाऊ शकते. दरम्यान, संकल्प पत्राच्या घोषणेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी कर्नाटकातील म्हैसूर येथे जाहीर सभेसाठी आणि बंगळुरूमध्ये रोड शोसाठी रवाना होतील. सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपले सर्वाधिक लक्ष दक्षिण भारतावर केंद्रित केले आहे.

# भावना गवळींची नाराजी दूर?

**वाशिम | वृत्तसेवा**

मी नाराज होणाऱ्यांपैकी नाही. परंतु उमेदवारी न मिळाल्याने मला खंत वाटली. खंत वाटल्याने मी बाहेर पडली नाही. परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमच्या पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. त्यांनी ज्याप्रकारे राज्यात काम केले आहे. पोटतिडकीने ते रात्रंदिवस काम करतायेत. त्यात अबकी बार ४०० पार या यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेला साद देत मी महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचाराचे काम करणार आहे असे विधान यवतमाळ वाशिमच्या खासदार भावना गवळी यांनी केले आहे. त्यामुळे भावना गवळी यांची नाराजी दूर करण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना यश आल्याचे दिसून येते.

भावना गवळी म्हणाल्या की, मित्रपक्ष आणि घटक पक्षासोबत आमची आजपासून बैठक, मेळावे सुरू होतील. राजश्री पाटील यांना विजयी करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. मी २५ वर्षापासून काम करते, शिवसेना जिल्हाप्रमुख, खासदार म्हणून काम केलेय. माझे वडील शिवसेनेत होते. लहानपणापासून



बाळकडू मिळाले आहे. मला काय भेटते यासाठी मी काम करत नाही. माझे लक्ष पदावर नव्हते. जनतेने माझ्यावर विश्वास टाकला आहे त्याला तडा जाणार नाही यासाठी मी काम करत आहे. माझ्यासाठी शिवसेना पक्ष महत्त्वाचा आहे असे त्यांनी म्हटले. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत चर्चा चांगली झाली. पुढच्या काळात कसा प्रचार करायचा, कशा जबाबदाऱ्या घ्यायच्या त्यावर चर्चा झाली. राजश्री पाटील यांना निवडून आणण्याची जबाबदारी माझ्यावर दिली आहे. ज्यारितीने माझा प्रचार मी करत होते, तसेच महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. जे काही झाले ते भूतकाळ आहे. माझ्यासाठी शिवसेना पक्ष महत्त्वाचा असून मी कधी प्रसिद्धीच्या भानगडीत पडले नाही. सातत्याने माझ्या मताधिक्यात वाढ होत आलीय. पक्षासाठी मी बांधील आहे असे भावना गवळी यांनी सांगितले. दरम्यान, मी संघर्षातून पुढे आली आहे, त्यामुळे नाराज होत नाही. आपण कुठे कमी पडलो याचे आत्मचिंतन करणारी मी आहे. त्याचसोबत मी लढणार आहे आणि महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी लढणार आहे. २५ वर्ष मी कुटुंब म्हणून मतदारसंघात काम केले आहे. जुने ऋणानुबंध जुळले जातात. त्यामुळे मतदारांमध्ये काहीसी नाराजी वाटणे साहजिकच आहे. परंतु महायुतीच्या उमेदवाराला विजयी करणे यासाठी आम्ही कामाला लागलो आहे. माझ्या आयुष्यात नेहमी चढउतार पाहिले आहे असे भावना गवळी यांनी म्हटले.

# विशाल पाटलांनी सांगलीत लढायची हिंमत दाखवली तर पाठिंबा देऊ, निवडूनही आणू; प्रकाश आंबेडकरांचे मोठे वक्तव्य

सांगली | प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून सांगली लोकसभेच्या जागेवरुन महाविकास आघाडीत तणावाचे वातावरण आहे. या जागेवरुन ठाकरे गटाने चंद्रहार पाटील यांना उमेदवारी घोषित केली आहे. परंतु, ही काँग्रेसची परंपरागत जागा असल्याचे सांगत विशाल पाटील यांनी त्यांच्यासमोर शड्डू ठोकला आहे. विशाल पाटील यांनी आता सांगलीतून अपक्ष लढण्याची तयारी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी एक महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. विशाल पाटील हे सांगलीतून रिंगणातून उतरल्यास आपण त्यांना पाठिंबा देऊ, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

प्रकाश आंबेडकर यांची शनिवारी नागपूरच्या उमरेड येथे सभा झाली. यावेळी त्यांनी सांगली लोकसभेच्या जागेबाबत भाष्य केले. या सभेत त्यांनी म्हटले की, चार दिवसांपूर्वी प्रतीक पाटील माझ्याकडे आले



होते, काय करायचं विचारत होते. मी त्यांना म्हणालो की, हिंमत असेल, तर लढा. तुम्ही लढलात तर आम्ही तुम्हाला पाठींबा देतो. आता त्यांच्यात हिंमत आहे की, नाही पाहायचे आहे. ते लढले, तर पाठिंबाही देऊ आणि निवडून आणू, अशी ग्वाही देतो, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. प्रकाश आंबेडकर यांच्या या भूमिकेमुळे महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. अगोदरच मविआच्या चंद्रहार पाटील यांच्यासमोर भाजपच्या संजयकाका पाटील यांचे कडवे आव्हान आहे. संजयकाका पाटील यांच्या तुलनेत चंद्रहार पाटील हे राजकारणात नवखे आहेत. तसेच सांगली पट्ट्यात ठाकरे गटाची स्वत:ची अशी फारशी ताकद नाही. येथील बहुतांश आमदार काँग्रेस आणि शरद पवार गटाचे आहेत. अशात विशाल पाटील यांनी बंडखोरी करुन अपक्ष निवडणूक लढल्यास चंद्रहार पाटील यांच्यासाठी सांगलीतून निवडून येणे अत्यंत अवघड असेल.

### चंद्रहार पाटलांच्या प्रचारासाठी सभेला विश्वजीत कदम–सतेज पाटलांना निमंत्रण

शिवसेना उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ सोमवार १५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता सांगलीतील भावे नाट्य मंदिर येथे महाविकास आघाडीचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ताकदीने उपस्थित राहणार आहे. या मेळाव्यास जयंत पाटील, सतेज पाटील, विश्वजीत कदम यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. याचबरोबर महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांना तसेच इंडिया आघाडीच्या सर्व घटक पक्षांना मेळाव्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्य आणि स्वर्गाचे आमिष दाखवून डॉक्टरची ५ कोटींची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्य आणि स्वर्गाचे आमिष दाखवून डॉक्टर असलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाची ५ कोटी ३७ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. हा सर्व प्रकार १७ ऑक्टोबर २०१८ ते ११ एप्रिल २०२४ या कालावधीत एनआयबीएम रोड, कोंढवा येथील मेफअर एलिगंज फेज २ येथे घडला आहे.

याबाबत डॉ. अहमदअली इनामअली कुरेशी (वय-६७) रा. रो हाऊस नं. २०, मेफअर एलिगंज फेज-२, एनआयबीएम रोड, कोंढवा) यांनी शुक्रवारी (दि.१२) कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन सादीक अब्दुलमजीद शेख, यास्मीन सादीक शेख, एतेशाम सादीक शेख, अम्मार सादीक शेख (सर्व रा. हार्मोनी सोसायटी, गुलटेकडी), राज आढाव उर्फ नरसु यांच्यावर आयपीसी ४२०, ४०६, ३२३, ४०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे व्यवसायाने डॉक्टर आहेत. आरोपी सादिक शेख याची पत्नी यास्मिन मुले एतेशाम व अम्मार यांनी फिर्यादी यांच्यासोबत चांगले संबंध प्रस्थापित केले. फिर्यादी यांच्यसोबत वेळोवेळी गोड बोलून धार्मिक गोष्टी सांगून त्यांना प्रभावित केले. त्यांना पुण्य कमावून स्वर्ग मिळवण्याचे आमिष दाखवले. तसेच वेळोवेळी फिर्यादी यांच्या मालमत्तेचे ११ बक्षीसपत्र स्वत:च्या नावावर करुन घेतले.

तसेच फिर्यादी यांच्याकडून रोख रक्कम, सोन्याच्या वस्तू आणि सोन्याचे बिस्किटे इत्यादी कोटच्यवधी रुपयांची मालमत्ता उकळली. आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांची ५ कोटी ३७ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी सर्व मालमत्ता परत मागितली. मात्र आरोपींनी मालमत्ता परत देण्यास नकार देऊन फिर्यादी यांची कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा अपहार करुन फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) पाटील करीत आहेत.

# गांधर्व महाविद्यालय, 'सप्रेम' आयोजित युवा संवादिनी संमेलनास सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय संगीत प्रसारक मंडळाचे गांधर्व महाविद्यालय व संवादिनी प्रेमी मंडळ (सप्रेम) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अण्णासाहेब बेहरे स्मृती युवा संवादिनी संमेलनाला शनिवारी (दि. १३) सुरुवात झाली. संमेलनात १२ गुरुंच्या १८ शिष्यांचे सादरीकरण होणार आहे.

संमेलन गांधर्व महाविद्यालयाच्या विष्णू विनायक स्वरमंदिरात दि. १३ व दि. १४ रोजी तीन सत्रात आयोजित करण्यात आले असून संमेलनात १६ ते ३० या वयोगटातील युवा संवादिनी वादकांचा सहभाग असणार आहे. संमेलनाचे उद्घाटन अण्णासाहेब बेहरे यांचे पुत्र अशोक बेहरे आणि स्नुषा अरुणा बेहरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित प्रमोद मराठे, परिणीता मराठे, रवींद्र आपटे उपस्थित होते.



युवा संवादिनी संमेलनाच्या माध्यमातून अण्णासाहेब बेहरे यांच्या स्मृती जागृत ठेवल्याबद्दल कुटुंबियांच्या वतीने आभार व्यक्त करून अशोक बेहरे म्हणाले, संमेलनाद्वारे युवा कलाकरांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत असून रसिकांनाही कलाकारांच्या कलेचा आस्वाद घेता येत आहे. प्रास्ताविकात प्राचार्य पंडित प्रमोद मराठे म्हणाले, अण्णासाहेब बेहरे यांना लहानपणापासूनच संवादिनी वादनाची आवड होती. शालेय, उच्चशिक्षण आणि व्यवसायामुळे ते कलेसाठी वेळ देऊ शकले नाहीत. बेहरे यांनी वयाच्या ६५व्या वर्षी गांधर्व महाविद्यालयात संवादिनी वादनाच्या शिक्षणास सुरुवात केली. अखेरच्या श्वासापर्यंत ते संवादिनी वादनाचे शिक्षण घेत होते आणि वादनही करीत होते. मान्यवरांचा सत्कार रवींद्र आपटे यांनी केला तर कलाकरांचा सत्कार अरुणा बेहरे यांनी केला. सूत्रसंचालन वैष्णवी पवळे यांनी केले. संमेलनाच्या पहिल्या सत्राची सुरुवात सुधन्वा कुलकर्णी याच्या संवादिनी वादनाने झाली. त्यास श्रीधर गावकर यांनी तबला साथ केली. दुसरे सत्र रविवार, दि. १४ रोजी सकाळी ९ ते १ या वेळात होणार असून यात प्रथमेश चोपडे, स्वानंद राजोपाध्ये, अंकिता कुंभार, ओजस रानडे, यश खडके, सारंग सांभारे यांचे वादन होईल. अखरेचे तिसरे सत्र (दि. १४) सायंकाळी ५ ते ९ या वेळात होत असून यात मालू गावकर, नचिकेत हरिदास, अथर्व कुलकर्णी, आकाश जलमी, वरद सोहनी, अमेय बिच्चु यांचे संवादिनी वादन होणार आहे. कलाकारांना केदार टिकेकर, श्रीधर गावकर, पराग पांडव, अमित जोशी, सोहम राजोपाध्ये, राज भद्र, आशय कुलकर्णी, अनुराग अलुरकर, चिन्मय लेले, प्रसाद महाजन तबला साथ करणार आहेत. संमेलन सर्वांसाठी खुले आहे.

# दुचाकीवरुन मेट्रोसाठी पाहणी : महापालिका आणि विभागीय आयुक्तांचा अनोखा उपक्रम

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

शिवाजीनगर ते लोणी काळभोर यादरम्यान मेट्रोच्या हालचालींना वेग आला आहे. प्रशासकीय सेवेतील दोन मोठ्या अधिकाऱ्यांनी दुचाकीवरून पाहणी केल्याची राज्यातील पहिली घटना आहे.

लोणी काळभोर पंचक्रोशीतील नागरिकांचा पुण्यापर्यंतचा प्रवास आणखी वेगवान आणि सुखकर होण्याच्या दृष्टीने मेट्रो प्रशासनाने पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. शिवाजीनगर ते लोणी काळभोर यादरम्यान मेट्रो सुरु करण्याच्या हालचालींना वेग आल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



शिवाजीनगर ते लोणी काळभोर हे २१ किलोमीटर अंतर आहे. या मार्गाची पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व महानगरपालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी थेट दुचाकी चालवत पाहणी केली. शनिवार (१३ एप्रिल) रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर येथून मेट्रोच्या रस्त्याची पाहणी करण्यात सुरुवात केली. त्यानंतर पुलगेट, हडपसरमार्गे ते लोणी काळभोरपर्यंत आले. लोणी काळभोर येथील राहिंज वस्ती परिसरात आल्यानंतर मेट्रो कारशेडच्या जागेची पाहणी केली. त्यावेळी अधिकाऱ्यांची मेट्रो सुरु करण्याच्या बाबातीत सकारात्मक चर्चा झाली. लोणी काळभोरपर्यंत मेट्रो होण्याच्या दिशेने हे पहिले पाऊल पडले आहे. तर विभागीय आयुक्त व महानगरपालिकेचे आयुक्त अशा दोन मोठ्या अधिकाऱ्यांनी मोटारसायकलवरून पाहणी करण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच घटना असेल. लोणी काळभोरपर्यंत मेट्रो येणार असल्याने नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. शिवाजीनगर ते लोणी काळभोर विस्तारित मेट्रो प्रकल्प 'खासगी भागीदारी तत्त्वावर' (पीपीपी) की 'ठेकेदाराची नेमणूक करून' (ईपीसी) राबविणे योग्य आहे, याची तपासणी करण्यासाठी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) आर्थिक तांत्रिक सल्लागार नेमण्यात आला आहे.

# पुण्यात पुढील दोन दिवस पावसाची शक्यता, उकाड्यापासून तात्पुरता दिलासा, 'या' जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट!

**पुणे । प्रतिनिधी**

पुढील दोन दिवस पुण्यात पाऊस पडू शकतो, अशी शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे पुणेकरांना प्रखर उन आणि उकाड्यापासून दिलासा मिळू शकतो. दोन दिवसांपासून पुण्यात दमट वातावरण असून तापमान ३९ अंशाच्या जवळपास आहे.

पुण्यात अजूनही तापमान ३९ अंशाच्या पुढे गेलेले नाही आहे. मात्र मे महिन्यात तापमान वाढण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, तापमान ४३ अंशापर्यंत जाऊ शकते. त्यामुळे मे महिन्यात पुणेकरांना उन्हाच्या झळांचा सामना करावा लागू शकतो. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रातून आद्रतायुक्त वारे गुजरातमार्गे महाराष्ट्र आणि पुण्याकडे वाहत आहेत, त्यामुळे शहरात सध्या दमट वातावरण जाणवत आहे. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण वाढले तरी डिहायड्रेडशन होण्याची शक्यता असते, त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी. कमाल तापमान ४३ ते ४५ अंश सेल्सिअस असते तेव्हा उष्णतेची लाट म्हटले जाते. पुण्यात सध्या तरी तशी लाट नसल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील चार दिवस राज्याच पावसाची शक्यता आहे. राज्यात विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात पाऊस पडू शकतो. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्ये सोलापूर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळचा समावेश आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरातील वाहतुकीत बदल

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागात मिरवणुका काढल्या जातात. तसेच पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजारो अनुयायी शहरातील विविध भागातून येत असतात. या पार्श्वभूमीवर पिंपरी, भोसरी, हिंजवडी, सांगवी परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. हा बदल रविवारी (१४ एप्रिल) दुपारी १२ पासून मिरवणुका संपेपर्यंत असणार आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिले आहेत.

महावीर चौक चिंचवडकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या वाहतुकीस बंदी. या मार्गावरील वाहने चिंचवड डीमार्ट इन ग्रेड सेपरेटर मार्गे जातील. नाशिक फाट्याकडून बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व्हिस रोडने येणाऱ्या वाहनांना बंदी. ही वाहने डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एचपी पेट्रोल पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इन मार्गे जातील.

स्व. इंदिरा गांधी पूल ते बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणाऱ्या सर्व वाहनांना बंदी. ही वाहने मोरवाडी चौक मार्गे जातील. नेहरुनगर चौकाकडून बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्व वाहनांना प्रवेश बंदी. या मार्गावरील वाहने कॉर्नर बसस्टॉप येथून मासुळकर कॉलनी मार्गे जातील. जय मल्हार खानावळ सम्राट चौकपासून मोरवाडी चौकाकडे जाणारा मार्ग सर्व वाहनांसाठी बंद असेल. सायन्स पार्ककडून मोरवाडी चौकाकडे येणारा मार्ग बंद असेल. या मार्गावरील वाहने ऑटो क्लस्टरकडून मदर टेरेसा उड्डाण पुलावरून जातील.

क्रोमा शोरूमकडून गोकुळ हॉटेलकडे जाणारा मार्ग बंद असेल. पिंपरी चौकाकडून पिंपरी पुलाकडे जाणारा मार्ग आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल.

अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांसाठी संत तुकारामनगर जवळील एचए कंपनीच्या पार्किंगमध्ये पार्किंगची सोय करण्यात आली आहे.

हॅरिस ब्रिज ते फुगेवाडी चौक सर्व्हिस रस्त्याने जाण्यास प्रवेश बंद असेल. हॅरिस ब्रिजने ग्रेड सेपरेटर मार्गे जाता येईल. बोपोडी संविधान चौकाकडून दापोडी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे जाण्यास बंदी असेल. या मार्गावरील वाहने हॅरिस ब्रिज दापोडी मार्गे इच्छित स्थळी जातील. शितळा देवी चौकाकडून दापोडी गावाकडे जाण्यास बंदी असेल. या मार्गावरील वाहने शितळादेवी चौकाकडून सांगवी मार्गे जातील. जुनी सांगवी पीएमपीएमएल शेवटचा बस स्टॉप नदी पुलावरून दापोडीकडे जाण्यासंबंधी असेल. या मार्गावरील वाहनांना माकन चौक किंवा ममतानगर चौकातून जाता येईल.

कस्तुरी चौक ते श्री शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांना बंदी असेल. या मार्गावरील वाहने कस्तुरी चौक येथून उजवीकडे वळून विनोदी वस्ती मार्गे व डावीकडे वळून इंडियन ऑइल चौक मार्गे जातील. मेझा ९ चौकाकडून हिंजवडी गावठाणकडे जाणारी वाहतूक श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सरळ पुढे जाऊन इंडियन ऑइल चौक, कस्तुरी चौक, विनोदे वस्ती मार्गे जाईल. जांभूळकर जिम चौकाकडून हिंजवडी गावठाणकडे जाणारी वाहतूक जांभूळकर जिम चौकातच यू टर्न घेऊन परत इंडियन ऑइल चौक, कस्तुरी चौक, विनोदे वस्ती चौक मार्गे जाईल. मेझा ९ चौकाकडून श्री शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या दोन लेनपैकी डावी लेन बंद असेल. सर्व वाहतूक उजव्या बाजूच्या लेनने सुरू राहील.

# ढगाळ हवामानाने कांदा उत्पादकांची चिंता वाढली; बराकी बांधण्याची कामे सुरू

**पारगाव । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शुक्रवारी (दि. १२) सकाळपासूनच ढगाळ हवामानाचे सावट निर्माण झाल्याने कांदा उत्पादक शेतकर्यांची चिंता वाढली आहे. काढलेला कांदा शेतामध्येच आहे. तो पावसाने भिजू नये, यासाठी शेतकर्यांनी बराकी बांधण्याची कामे हाती घेतली आहेत. तालुक्याच्या पूर्व भागात कांदा काढणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. अनेक शेतकर्यांचे काढणी केलेले कांदे शेतामध्येच उघड्यावर आहेत. शुक्रवारी सकाळपासून या परिसरात ढगाळ हवामानाचे सावट निर्माण झाले आहे. जर अवकाळी पाऊस पडला तर कांदे भिजून मोठे नुकसान होईल. या चिंतेत कांदा उत्पादक शेतकरी आहेत.



कांदा भिजू नये, यासाठी शेतकर्यांनी नवीन बराकी तयार करण्याची कामे वेगात सुरू केली आहेत. बराकी दीर्घकाळ टिकाव्यात, यासाठी शेतकरी लोखंडाचा वापर करताना दिसत आहेत. परंतु, लोखंडाचे भावही गगनाला भिडल्याने अनेक शेतकर्यांनी बराकीसाठी लाकडे, पाचट, बांबूंचा वापर सुरू केला आहे. नवीन काढणी केलेल्या कांद्याला बाजारभाव समाधानकारक मिळत नाही. सध्या नवीन कांद्याला १० किलोला १२० ते १४० रुपये बाजारभाव मिळत आहे. कांदा पिकासाठी गुंतविलेल्या भांडवलाच्या तुलनेत सध्याचा बाजारभाव शेतकर्यांना परवडणारा नाही. त्यामुळे शेतकर्यांनी कांदा साठवायला सुरुवात केली आहे. ढगाळ हवामानामुळे कांदा उत्पादक शेतकरी आता धास्तावले आहेत.

## बंद सदनिकेत आढळले दांपत्याचे मृतदेह

बारामती : बारामती शहरात शनिवारी (दि. १३) भर दुपारी एका सदनिकेमध्ये एका दांपत्याचे मृतदेह आढळून आले आहेत. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत. सचिन महालिंग वाघोलीकर (वय ५०) व त्यांच्या पत्नी सारिका (वय ४२) या दोघांचे मृतदेह आढळून आले आहेत. शहरातील जामदार रस्त्यावरील खत्री-पवार पार्कमधील सदनिका क्रमांक १०२ मध्ये ही घटना उघडकीस आली.

त्यांची मुले शनिवारमुळे शहरानजीक कन्हेरी येथे मारुती मंदिरात गेली होती. ती परत आली असता सदनिकेला बाहेरून कडी असल्याचे दिसून आले. त्यांनी कडी काढून आतमध्ये प्रवेश केला असता बेडरूममधील कपाट व दुसऱ्या खोलीतील डबे अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आले. किचनमध्ये पाहिले असता या दोघांचे मृतदेह आढळून आले. भर दिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चोरीच्या उद्देशाने हा खून करण्यात आला की घातपात याबद्दल विविध तर्कांना उधाण आले आहे.

# काकडे, तावरेंच्या भेटीने पवारांकडून नवीन समीकरणे?

बारामती : : ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी शुक्रवारी (दि. १२) काकडे कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतल्यानंतर एकेकाळचे जुने व विश्वासू सहकारी चंद्रराव तावरे यांचीही भेट घेतली. या भेटीने बारामती तालुक्यात नवीन राजकीय समीकरणे उदयाला येतील का? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. माजी खासदार कै. संभाजीराव काकडे यांच्या पत्नी कंठावतीताई यांचे नुकतेच पुण्यात निधन झाले. त्यानंतर सुरुवातीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील काकडे कुटुंबाच्या निवासस्थानी जात भेट घेतली होती. शुक्रवारी शरद पवार यांनी थेट निंबुत गाठत येथे ज्येष्ठ नेते श्यामकाका काकडे, सतीश काकडे यांची सांत्वनपर भेट घेतली. या भेटीत अन्य कोणतीही चर्चा झाली नाही. परंतु, बारामती तालुक्यात काकडे व पवार यांचा संघर्ष जनतेने अनेक वर्षे पाहिला आहे.



आता राष्ट्रवादीतील फुटीनंतर राजकीय समीकरणे बदलली आहेत. सध्या काकडे परिवारातील सतीश काकडे हे अजित पवार यांच्यासोबत आहेत. 'सोमेश्वर'चे माजी अध्यक्ष शहाजीराव काकडे हेही अजित पवार यांच्या साथीला आहेत. राजकारणात कधी काय घडेल, याचा भरवसा आज-काल राहिलेला नाही. सतीश काकडे हे अन्य बाबतीत अजित पवार यांच्या सोबत असले, तरी सोमेश्वर कारखान्याबाबत त्यांनी सभासदहितासाठी लढा कायम ठेवला आहे. परंतु, राजकारणात कधी काय घडेल, याचा भरवसा आज-काल राहिलेला नाही. दुसरीकडे, सांगवी परिसरात पवार आल्यानंतर त्यांनी चंद्रराव तावरे यांचीही भेट घेतली. एकेकाळी हे दोघे मित्र बारामतीच्या राजकारणात एकत्र होते.

अजित पवार यांच्या राजकारणामुळे ते एकमेकांपासून दुरावले. त्यात शरद पवार यांनी मध्यस्थीचाही प्रयत्न केला होता. परंतु, तरीही मनोमिलन झाले नाही. चंद्रराव तावरे-रंजन तावरे या गुरू-शिष्यांच्या जोडगोळीने अजित पवार यांच्याविरोधात माळेगाव कारखान्याबाबत विरोधी भूमिका घेतली. सोमेश्वरची गावे माळेगाव कारखान्याला जोडण्याच्या विषयात प्रतिष्ठा पणाला लावत हा डाव हाणून पाडला होता.

आता राजकीय समीकरणे बदलली असून, खुद्द अजित पवार हेच महायुतीसोबत गेले आहेत. चंद्रराव व रंजन तावरे हे भाजपमध्ये सक्रिय आहेत. अद्याप ते महायुतीच्या प्रचारात बारामतीत दिसलेले नाहीत.

पक्ष म्हणून ते आता काय भूमिका घेतात, हेही अजून स्पष्ट झालेले नाही. आता पवार यांच्या भेटीनंतर नवीन राजकीय समीकरणे भविष्यात उदयाला येऊ शकतील, अशीही शक्यता वर्तविली जात आहे. माळेगाव कारखान्यावर सध्या अजित पवार गटाचे वर्चस्व आहे. भविष्यात कारखाना ताब्यात घ्यायचा झाल्यास या गुरू-शिष्यांना शरद पवार यांची मदत गरजेची आहे. त्यामुळे भविष्यात राजकारणात काय घडेल, याकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, चंद्रराव तावरे यांनी पवारांच्या भेटीवर 'ते सांत्वनपर भेटीसाठी या भागात आले होते. त्यांचा पक्ष वेगळा, आमचा पक्ष वेगळा आहे. आमच्यात अन्य कोणतीही चर्चा झाली नसल्याचे' सांगितले आहे.

# माउलींची पालखी गडाच्या पायथ्याशी नेत देव भेट करा - आ.संजय जगतापांची विनंती

**जेजुरी । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा पूर्वी जेजुरी शहरातून नंदी चौक मार्गे जात गडाच्या पायथ्याशी खंडोबा देवाची भेट घेतली जात होती. कालांतराने हा मार्ग बदलला गेला. या वर्षीपासून पुन्हा पालखी सोहळा जेजुरी गडाच्या पायथामार्गे नेण्यात यावा, अशी विनंती जेजुरीकर ग्रामस्थांच्या वतीने आमदार संजय जगताप यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी यांना केली. या संदर्भात आपण पत्रव्यवहार करणार असल्याचेही आमदार जगताप यांनी या वेळी सांगितले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दि. ५ जुलै रोजी जेजुरी मुक्कामी विसावणार आहे. या अनुषंगाने वारकर्यांच्या सोयीसुविधांबाबतचे नियोजन करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीचे विश्वस्त व पालखी सोहळ्यातील प्रमुखांनी जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असणार्या पालखी तळाची पाहणी केली.



या वेळी आमदार जगताप बोलत होते. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीचे प्रमुख विश्वस्त अॅड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळाप्रमुख योगी निरंजननाथ, पालखी सोहळ्याचे मुख्य चोपदार राजाभाऊ चोपदार, पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तहसीलदार डॉ. शैलजा पाटील, गटविकास अधिकारी डॉ. अस्मिता पवार, जेजुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, महेश दरेकर, जेजुरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी या वेळी उपस्थित होते. पालखी तळावरील काही भागाचे सपाटीकरण करणे, तळावर पालखी विसावण्यासाठी ओटा बांधणे, अत्यावश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करणे, स्वच्छता, पाणी, आरोग्य, वाहनतळ याबाबत या वेळी चर्चा करण्यात आली, तर गुरुवारी (दि. १८) चैत्रवारी बैठकीत याविषयी चर्चा करण्यात येईल, असे विश्वस्त मंडळाने सांगितले.